वर्धापन विशेष

लव्ह जिहाद : द्वेषमूलक अपवादतंत्र!

कलीम अज़ीम

विविध जाती-धर्म-संप्रदायातील स्त्री-पुरूषांमधील प्रेम प्रकरणं आणि विवाह ही भारतात सामान्य बाब आहे. कारण इथला समाज बहुधर्मीय आहे. तो आपापल्या जाती-धर्म-पंथासह सहजीवनात राहतो. सहजीवनामुळे ट्यूनिशिया, इंडोनेशिया सारख्या काही देशात आंतरधर्मीय लग्नं कायदेशीर आहेत. मात्र, लव्ह जिहादची व्याख्या करून हिंदू राष्ट्रवाद्यांकडून सांप्रदायिक अजेंडा राबवला जातो. नित्य चर्चा घडवून मुस्लीम समुदायाचं राक्षसी चित्र रंगवलं जातं. हे राजकीय मतांसाठी ध्रुवीकरण असलं तरी याचे दीर्घकालीन परिणाम भारताच्या सद्भावनेच्या परंपरेवर पडत आहेत. भारतात हजारो वर्षापासून बहुसंस्कृतिक परंपरा आहे. परंतु मानवताविरोधी भूमिकेसाठी प्रसिद्ध राजकीय पक्ष आणि त्यांच्या सहयोगी संघटना सामाजिक सलोखा बिघडवून अशांतता पसरवत आहेत. हे केवळ देशाच्या राजकीय संस्कृतीवर आलेलं केवळ आक्रमणाचं संकट नसून, वैविध्याने नटलेल्या भारतीय परंपरेवर ओढवलेली ही भयंकर आपत्ती आहे, हे लक्षात घ्यायला हवं.

काही वार्ता

* पीर पिंपळगाव, जालना : लग्न मंडपातून लेकीला फरफटत घरी आणून फासावर चढवले (१६ डिसेंबर २०२२).
* आजमगढ़ : प्रेमिका से खफा युवक ने प्रेमिका के लाश के ५ टुकड़े कर कुएं में फेका (२१ नोव्हेंबर २०२२).
* जयपूर : महिला की लाश के १० टुकड़े कर जंगल में फेक आया भतीजा (१७ डिसेंबर २०२२).
* बागलकोट, कर्नाटक : जल्लाद बेटे ने बाप के किए ३२ टुकडे, फिर बोरवेल में डाल दी लाश (२३ डिसेंबर २०२२).

वरील चार बातम्या गेल्या दोन महिन्यांतील आहेत. तर पाचवी, सहावी, सातवी पुढे किती तरी घटना अशा असतील, की ज्यांना बातमी होण्याचं सौभाग्य लाभेलच असं मानता येत नाही. तशा या घटना प्रातिनिधिक आहेत. गुगल सर्च केल्यावर ज्या प्रथमदर्शनी आढळल्या, तेवढ्याच इथं नोंदवल्या आहेत. दररोज वाचलेली बरीच वृत्ते, बातम्या स्मृतीतून निसटली आहेत. त्यामुळे त्यांची नोंद इथं देता आली नाही. १५ नोव्हेंबर २०२३ ला श्रद्धा वालकर हत्या प्रकरण उघडकीस आल्यानंतर मिडीयाआऊट झालेल्या या बातम्या आहेत. याच दरम्यान महाराष्ट्रात अशाच नृशंस घटना घडल्या. परंतु त्या प्रसिद्धीमाध्यमात जागा मिळवू शकल्या नाहीत. त्याचं कारण त्यात त्यांना 'वेगळ्या धर्मा'चा शोध लागू शकला नाही. कारण मृतक व हल्लेखोर 'हिंदू' या धार्मिक संज्ञेत एकवटले होते. त्या घटनेपैकी एकाही आरोपीचं नाव आफताब पूनावाला याच्यासारखं मिळतं-जुळतं असतं तर कदाचित सर्वच वृत्तं प्रसिद्धीझोतात आली असती.

श्रद्धा वालकर प्रकरणानंतर भारतात पुन्हा एकदा मुस्लिमांच्या चारित्र्यहननाचं सत्र गतिमान झालं. कौटुंबिक हिंसाचाराला 'धर्मयुद्धा'शी जोडून धार्मिक व जातीय ध्रुवीकरण सुरू झालं. परिणामी हिंदुत्ववाद्यांनी देशभरात 'हिंदू खतरे में है' म्हणत मोर्चे काढून जनसामान्यांची मनं

अस्थिर करणं सुरू केलं. असाच एक मोर्चा या नववर्षात जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात आमच्या आंबाजोगाई शहरात पाहण्याचा योग आला. जहरी, विखारी, मुस्लीमद्वेषी, प्रेमविरोधी व प्रतिगामी अशा कितीतरी संज्ञा या मोर्च्याला लावता येऊ शकतील. पुण्यात वा नाशिक किंवा कोल्हापूर येथील मोर्चा असो, हिंदुत्ववाद्यांचे मोर्चे म्हणजे, मुस्लीम समुदायाविरोधात जनमानस कलुषित करण्याचा प्रकार असतो. या मोर्चात स्त्रिया व मुलींची संख्या लक्षणीय होती. बहुतेक महिला या चाळीशीतील होत्या. म्हणजे त्या माता होत्या. स्वाभाविक याचा अर्थ आपल्या संस्कारित पाल्यांवर त्यांचा विश्वास नव्हता. आपल्या संततीवर अविश्वास व्यक्त करणारे असे लोंढेच्या लोंढे या मोर्चात सामील झाले होते. कथित लव्ह जिहाद प्रकरणी कायदा करावा अशा मागणीसाठी राज्यव्यापी मोर्चा मोहीम राबवली जात आहे.

केंद्रात असो वा (एकोणीस) राज्यांत सत्तापक्ष हिंदुत्ववादी विचारांचा आहे, त्यामुळे कायदा करायचा असेल तर तो थेट करता येऊ शकतो. मग आपल्याच सरकारविरोधात हे मोर्चे का काढले जात आहेत, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. याचं प्रमुख कारण देशात मुस्लीम विरोधी वातावरण तयार करण्याच्या प्रक्रियेला गती देणे हे उद्दिष्ट आहे. या मोर्च्यांच्या निमित्तानं मुस्लीम विरोधात बहुसंख्याक समुदायाचं मन कलुषित करणं, संदेहाला जागा करून देणं, मुस्लीमांचं भयगंड तयार करणे, जनमानस संभ्रमित करणे, बुद्धिभेद घडवून आणणं तसंच मुस्लिमांना बदनाम करणं, त्यांचं मानसिक खच्चीकरण करणं, सांस्कृतिक उध्वस्तीकरण घडवून आणणं इत्यादी कार्य उघड व सुप्तपणे राबवली जात आहेत. हिंदुवादी व कर्मठ प्रवृत्तीच्या संघटना, संस्था, राजकीय पक्ष कथित 'लव्ह जिहाद'च्या नावाने आभासी वातावरण निर्माण करून मोर्चे, निषेध सभा घेऊन सामाजिक सलोखा अस्थिर करत आहेत. हे मोर्चे समाजात धार्मिक तेढ व कटुता वाढवत भारताच्या बहुसांस्कृतिकतेला आव्हान देत आहेत.

व्यक्ती स्वातंत्र्यावर घाला

श्रद्धा हत्या प्रकरणानंतर महाराष्ट्र सरकारने कथित 'लव्ह जिहाद'संबंधी कायदा करण्याची घोषणा केली. त्यानंतर हिंदुवाद्यांच्या मोर्चामध्ये एकाएकी गती आली. वास्तविक अशा प्रकारचा कायदा राज्यघटनेच्या मूळ तत्वाशी विसंगत आहे. राज्यघटनेने प्रत्येक नागरिकांना व्यक्ती स्वातंत्र्य दिलं आहे. तसंच सज्ञान व्यक्तीला आपल्या पसंतीने कोणत्याही धर्मात लग्न करण्याची मुभाही दिलेली आहे. त्यामुळे अशा प्रकारचे कायदे करणे म्हणजे राज्यघटनेला आव्हान देण्यासारखं आहे. पुढे अशा प्रकारचे विवाह रोखण्यासाठी शासनाने एक समन्वय

समिती नेमली.

या संदर्भात राज्य सरकारच्या महिला व बालकल्याण विभागाने १३ डिसेंबर २०२२ रोजी एक परिपत्रक काढलं. या खात्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा हे समितीचे अध्यक्ष आहेत. या पत्रकात म्हटलं आहे, की नोंदणीकृत/अनोंदणीकृत विवाह, धार्मिक स्थळी करण्यात आलेले विवाह, पळून जाऊन केलेले विवाह अशा प्रकारे आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह केलेल्या व्यक्तींची इत्थंभूत माहिती प्राप्त करणं. नवविवाहीत मुली/महिला तसेच त्यांच्या कुटुंबियांशी संपर्क करून सद्य:स्थितीत ते एकमेकांच्या संपर्कात आहेत किंवा कसं? याबाबत माहिती घेणं, स्वतःच्या कुटुंबियांच्या संपर्कात नसलेल्या मुली/महिला यांच्या आई-वडिलांच्या सहाय्यानं माहिती घेणं, आई-वडील इच्छुक नसल्यास तज्ज्ञ समुपदेशकाद्वारे त्यांचं समुपदेशन करणं तसेच त्यांच्यामधील वाद-विवादाचं निराकरण करणं इत्यादीकरीता व्यासपीठ उपलब्ध करून याबाबतच्या कार्यवाहीचा आढावा घेण्याकरीता मा. मंत्री (महिला व बाल विकास) यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे शासकीय/

अशासकीय सदस्यांची ‘आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह परिवार समन्वय समिती’ (राज्यस्तरीय) गठीत करण्यात येत आहे...

या पत्रकातील तीन तरतुदी व्यक्ती स्वातंत्र्य व खासगी गोपनीयतेचा भंग करणाऱ्या आहेत.

(४) अशा प्रकारे आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह केलेल्या व्यक्तींची इत्थंभूत माहिती नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागामार्फत प्राप्त करणे.

(५) आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह केलेल्या नवविवाहीत मुली/महिला तसेच त्यांच्या कुटुंबियांशी संपर्क साधून सद्य:स्थितीत ते एकमेकांच्या संपर्कात आहेत किंवा कसे? याबाबत माहिती संकलित करणे.

(६) आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह केलेल्या, तथापि कुटुंबियांच्या संपर्कात नसलेल्या महिलांकडून त्यांच्या आई-वडिलांचा पत्ता घेऊन त्यांना माहिती करून देणे वा प्राप्त करणे.

राज्य सरकारने सुरू केलेल्या मॉरल पोलिसींगच्या या कायदाबाह्य कृतीमुळे अनेक सामाजिक धोके उत्पन्न होऊ शकतात. सरकार आंतरधर्मिय विवाहितांची माहिती संकलित करून ती संबंधित कुटंबिय, नातलग आणि इतर कर्मठ संघटनांना उपलब्ध करून देणार आहे. त्यातून संबंधित जोडप्याची सुरक्षितता धोक्यात येईल. शिवाय त्यांच्यामध्ये अस्वस्थता, घबराट निर्माण होईल. परिणामी कौटुंबिक कलह वाढेल. विवाहितांचे संसार उद्‌ध्वस्त होतील. त्यांच्या अपत्यांना हेटाळणीला सामोरं जावं लागेल. अर्थात सुरक्षितपणे जगणाऱ्या आंतरधर्मीय विवाहितांचे आयुष्य कष्टमय होईल.

या समितीचे सदस्य भाजप व संघ विचारांचे सदस्य/कार्यकर्ते/स्वयंसेवक/समर्थक आहेत. त्यामुळे उपरोक्त समितीची कार्यप्रणाली काय व कशी असेल, याविषयी अधिक भाष्य करण्याची गरज नाही. या पत्रकातील ‘आंतरजातीय’ शब्दावर आक्षेप नोंदवण्यात आला. अनेक संघटनांनी या संदर्भात निषेधाची पत्रके काढली. सरकार एकीकडे आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन योजना राबवते तर दुसरीकडे शासनाचं महिला विकास खातं अशा प्रकारचे विवाह सक्तीने थांबवण्यासाठी समिती स्थापन करते, हा परस्परविरोध नव्हे का? परिणामी दोन दिवसानंतर सदर पत्रकातील ‘आंतरजातीय’ शब्द वगळण्यात आला. आता त्यात फक्त ‘आंतरधर्मिय’ शब्द उरला आहे. शिवाय समितीत एक ‘मुस्लीम धर्मिय’ सदस्य म्हणून इरफान पीरजादे यांचा समावेश करण्यात आला आहे. पीरजादे हे राष्ट्रीय स्वयसेवक संघाच्या ‘राष्ट्रीय मुस्लीम मंच’चे पदाधिकारी आहेत. टीव्हीच्या स्क्रीनवरून ते उघडपणे मुस्लीम धोरणांचा विरोध करत असतात, धर्मश्रद्धांची खिल्ली उडवत असतात, कथित लव्ह जिहादच्या राजकीय संज्ञेचं समर्थन करत असतात. त्यामुळे हे गृहस्थ काय शोध घेणार हे कथन करण्याची गरज नाही.

या समितीत योगेश देशपांडे नावाचा एक सदस्य २००६च्या नांदेड ब्लास्ट प्रकरणातील आरोपी आहे. तो शहरातील मुस्लीमांचं सामूहिक हत्याकांड घडवून आणण्यासाठी घातपाताच्या योजनेत सहभागी होता. हा खटला अजूनही न्यायप्रविष्ट आहे. प्रखर विरोधानंतर सरकारने हे नाव समितीतून वगळलं. परंतु या समितीच्या माध्यमातून भाजप नेमकं काय साध्य करू पाहत आहे, हे उघड झालं आहे.

विभाजनकारी राजकारण

‘श्रद्धा वालकरचं जे झालं ते इतरासोबत होऊ नये’, म्हणून समिती स्थापन केल्याचं अध्यक्षानं जाहीर केलं. कौटुंबिक हिंसाचाराच्या एका घटनेला विशिष्ट धर्मसमुदायाशी जोडून त्याची बदनामी करण्याची मोहीम शासन दरबारी अधिकृतपणे सुरू झाली. दुसरीकडे हिंदू राष्ट्रवाद्याच्या महिलांविषयक कर्मठ भूमिकेची प्रस्थापना करण्याचा प्रकार सुरू होता. समितीच्या नावातील ‘आंतरजातीय’ शब्द काढला असला तरी तो टाकण्यामागची भूमिका तपासून घेतली पाहिजे. या समितीच्या लोकांची जातीय वर्गवारी केली तर त्यामागची छुपा अजेंडा अधिक स्पष्ट होतो. आंतरजातीय लग्न रोखण्याची ही कथित वांशिक शुद्धीकरण मोहीम आहे. या आधुनिक युगात उच्चशिक्षित व उच्चपदस्थ महिलांनी पुरुषप्रधानेला मान्य करावं, पुरुषांची दासी व्हावं, अशी या मागची भूमिका असावी. दुर्दैवाने, या विखारी धोरणाला महिलांकडून पाठबळ प्राप्त करून घेतलं जात आहे.

देश स्थायी लोकशाहीकडे वाटचाल करत असताना भारतीय जनमानसाला पुन्हा एकदा मध्ययुगात घेऊन जाण्याचे हे प्रयत्न आहेत. कथित हिंदू राष्ट्रवादाच्या नावाने बहुसंख्यांक समुदायाला धर्ममहात्म्याच्या बंदिस्त चौकटीत ढकलण्याची ही प्रक्रिया आहे. जाती-वर्ण व्यवस्था मजबूत करून जातिअंताच्या लढ्याला खीळ घालणारे हे धोरण आहे. एकीकडे समाज स्वत:ला आधुनिक म्हणवून जातिनिर्मूलनाची भाषा करतो, तर दुसरीकडे ब्राह्मणी जात उतरंडीवर आधारित विभागात अडकू पाहतो. आधुनिक विचारांच्या उच्चशिक्षित मुलींकडे हीन भावनेने पाहण्याची मानसिकता घडवण्याचा आणि बहुसंख्यांक समुदायाच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा हा प्रकार आहे.

संघ–भाजपने शबरीमला देवस्थान मंदिरात महिलांच्या प्रवेशाविरोधात उघड भूमिका घेतली आहे. त्याचं कारण देताना संघ–भाजप म्हणतो, 'महिलांमुळे विटाळ होतो'. सुप्रीम कोर्टाने मंदिर प्रवेशाला दिलेल्या आदेशामुळे भाजपने कोर्टाला तंबी दिली. त्याच वेळी मुस्लीम महिलांच्या दर्गा प्रवेशाच्या आंदोलनाला बळकटी द्यायची, मस्जिद प्रवेशाची मागणी करत कोर्टात याचिका दाखल करायची, ही हिंदू राष्ट्रवाद्याची दुटप्पी आणि विभाजनकारी भूमिका आहे. एकीकडे शालीनतेत बसणाऱ्या हिजाबला व अंगभर बुरख्याला विरोध करायचा, दुसरीकडे उर्फी जावेदच्या वस्त्रांना 'नंगट' म्हणायचं हे धोरण भाजपनं स्वीकारलं आहे. या उलट पूनम पांडे, शर्लिन चोपडा सारख्या सेलिब्रिटी नट्या मुंबईत राहून दररोज बिभत्स, अक्षरशः पॉर्न वीडियो उघडपणे पोस्ट करत असतात. त्यावेळी मात्र भाजपची महिला आघाडी गप्प बसून राहते. कारण त्यांच्याशी हिंदू धर्मीय संज्ञा बिलगलेली असते. अगदी हेच कंगना राणावत, पायल रोहतगी बाबतीत होतं. या नट्या कथितरीत्या अंगप्रदर्शन करणारे व उत्तेजित करणारे कपडे परिधान करतात; पण भाजप व त्याच्या समविचारी संघटना त्यांना (तशाच कपड्यात) आपल्या मंचावर मिरवतात. म्हणजे भाजपला अंगभर कपड्यांचा जसा त्रास आहे, तसाच कमी कपड्यांचाही आहे. अर्थात ही भाजपची राजकीय कुंचबणा आहे.

राज्यघटनेने दिलेल्या व्यक्ती स्वातंत्र्यात देशात कुठलाही नागरिक हवा तो धर्म स्वीकारू शकतो, त्याचा प्रसार करू शकतो. कायद्याने प्रौढ वयात प्रवेश केलेल्या कुठल्याही जाती-धर्माच्या स्त्री-पुरूषांना परस्परांशी विवाह करण्याचा अधिकार आहे. जात, राष्ट्रीयत्व किंवा धर्माच्या आधारावर तो काढून घेता येणार नाही. परंतु तत्सम विधेयकातून मुस्लीम समुदायाचं ध्रुवीकरण करणं व सामाजिक विभक्तीकरण करण्याचा हेतू आहे. या कायद्याचा सरळ-सरळ अर्थ असा, की तरूणींनी हिंदुंशिवाय इतर धर्मात प्रेमसंबंध व नातेसंबंध विकसित करता कामा नये. या उलट मुस्लीम तरुणींनी अशा प्रकारचे प्रेमविवाह केले तर त्याला घरवापसी म्हटलं जातं.

'बेटी पढाव' भूमिका राबवणाऱ्या भाजप या सत्तापक्षाचे अनेक नेते, पदाधिकारी गंभीर लैंगिक गुन्ह्यात अडकलेले दिसून येतात. अनेकांवर अल्पवयीन मुलींवर बलात्कार केल्याचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. अनेकांवर वेश्यालये, कॉल गर्ल रॅकेट चालवल्याचे आरोप आहेत. भाजपचे असे नैतिकरित्या भ्रष्ट पदाधिकारी कथित लव्ह जिहादच्या नावाने जनसामान्याच्या कौटुंबिक प्रकरणात नाक खुपसून मॉरल पोलिसींग करत आहेत. कथित लव्ह जिहाद पुढे करत तरुणींची काळजी करायची अन् त्याच वेळी इंटरनेटवर शाहीन बागमधील वृद्ध महिला आंदोलकांच्या शरीराची बोली लावायची. राणा अय्यूब व इतर मुस्लीम पत्रकार महिलांविरोधातील बलात्कार व ॲसिड हल्ल्याचं धमकीसत्र चालवायचं, त्यांच्यावर व्हर्चुअल हल्ले करायचे, जीवे मारण्याची चिथावणीखोर भाषा वापरायची, बिल्कीस बानोच्या बलात्कारींना हार–तुरे घालून सत्कार करायचे. द्वेषमूलक वातावरण तयार करण्याची ही प्रक्रिया नित्य सुरू आहे. त्याचा भाग म्हणून दररोज टीव्हीच्या स्क्रीनवर हिंदू–मुस्लीम चर्चा घडवणं, कुठल्याही घटनेत मुस्लीम अँगल्स शोधणं, फेक न्यूज तयार करून मुस्लिमांना झोडपणं, त्यांच्यावर हिंसक हल्ले करणं, खोट्या बातम्या प्रसारित करून मुस्लिमांचं हिंस्र चित्र उभं करणं इत्यादी प्रकार होतात.

दंगली घडविण्याचं शस्त्र

कथित लव्ह जिदाह रोखण्याच्या मागणीची आंदोलने, मोर्चे काढून बहुसंसख्याक समुदायाच्या मनात विष भरण्याचा अजेंडा आहे. मुस्लीम विरोधी वातावरण निर्माण करून दंगली, हिंसाचार, घातपात घडविण्यासाठी आवश्यक पार्श्वभूमी निर्माण करणे हा प्रमुख अजेंडा असल्याचं अनेक घटनांवरून दिसून येतं. त्यामुळेच अनेक किरकोळ घटनांना जातीय व धर्मीय अँगल देऊन सामाजिक अस्थिरता निर्माण केली जात आहे.

ट्विटरवर दररोज अशा प्रकारच्या किरकोळ घटनांना वारेमाप प्रसिद्धी देऊन मुस्लिमांच्या विरोधात हिंसक वातावरणाला गती दिली जाते. यात सरकारचे अनेक केंद्रीय मंत्री, वरिष्ठ पदाधिकारी, आयटी सेल प्रमुख, प्रशिक्षित व संघटित ट्रोलर इत्यादी मुस्लीम अँगल शोधलेल्या खोट्या बातम्या व्हायरल करतात. यात कथित लव्ह जिहाद मुसलमानाच्या सामाजिक बदनामीचं एक प्रभावी साधन झालेलं आहे. सातत्याने हा अपप्रचार करून आभास निर्माण केला जातो. खोटी आकडेवारी सादर करून दिशाभूल केली जाते. भाजप व संघ विचारांचे नेते प्रत्येक जाहीर सभेत हा मुद्दा आवर्जून उपस्थित करतात. जणू त्यांच्या प्रमुख कृती कार्यक्रमांपैकी हा ऐरणीवरचा विषय असावा.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी २६ मार्च २०२१ रोजी

आसाम विधानसभा निवडणुकीच्या प्रचार कार्यक्रमात कामरूप येथे कथित लव्ह जिहादसोबत कथित 'लँड जिहाद'चा मुद्दा उपस्थित केला. प्रथमच अधिकृतरीत्या अशा प्रकारे जमीन जिहादचा मुद्दा उपस्थित केला गेला. तो ही एका बड्या नेत्याकडून. त्या संदर्भात शाह म्हणतात, ''भाजपा के संकल्प पत्र में ढेर सारी बाते हैं, मगर सबसे बड़ी बात 'लव्ह जिहाद' और 'लैंड जिहाद' के खिलाफ कानून लाना है। अगर भाजपा की सरकार सत्ता में आएगी तो ये कानून लाने का काम जरूर करेगी। आसामी मुस्लिमांची लोकसंख्या वाढत आहे, या अफवेला बळकटी देत त्यांनी वरील विधान केलं होतं. भाजपच्या मते, मुस्लीम देशभरात मोठ्या संख्येने जागा खरेदी करून 'जमीन जिहाद' (?) करतात.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी कथित लव्ह जिहाद करणाऱ्या तरूणांना जीवे मारण्याची उघडपणे भाषा केली. ऑक्टोबर २०२० ला जौनपूरला एका प्रचार सभेत बोलताना त्यांनी म्हटलं, ''मैं उन लोगों को चेतावनी देता हूं जो पहचान छिपाते हैं और हमारी बहनों के सम्मान के साथ खेलते हैं। यदि आप सुधरते नहीं हैं तो आपकी राम नाम सत्य यात्रा निकलेगी।''

लव्ह जिहाद भाजप व त्यांच्या समविचारी संघटनांचं दंगली घडवण्याचं एक विशेष साधन झालेलं दिसून येते. २६ डिसेंबर २०२२ ला २००६ च्या मालेगाव स्फोटातील आरोपी व विद्यमान भाजपच्या खासदार प्रज्ञा सिंह ठाकुर यांनी दंगल घडवणारी प्रक्षोभक भाषा जाहिररीत्या वापरली. कर्नाटकच्या एका जाहीर सभेत बोलताना त्या म्हणाल्या, ''लव्ह जिहाद करणाऱ्यांना लव्ह जिहादसारखंच उत्तर दिलं पाहिजे. ...त्यासाठी हिंदूंनी आपल्या घरांमध्ये हत्यारं बाळगली पाहिजेत. काहीही नसलं तर भाजी कापण्याच्या सुरीला धार लावून घ्या''. अशा चिथावणीखोर भाषणामुळे सामाजिक अस्वस्थता पसरते व त्यातून सांप्रदायिक दंगली घडून येतात. प्रज्ञा सिंह यांनी अशी भाषा मुद्दामहून, दंगलीला उत्तेजन देण्यासाठी वापरली होती, हे नव्यानं सांगण्याची गरज नाही.

२०१४ नंतर मोदीप्रणित हिंदुत्ववादी सत्ताकाळातील गेल्या सात-आठ वर्षांत मुस्लीम समुदायाच्या विरोधात अनेक हिंसाचाराची प्रकरणं घडवून आणली गेली. मिरवणुका काढून प्रक्षोभक घोषणाबाजी करणे, मॉब लिंचिंग, ट्रेनमधून ढकलून देणे, जीवघेणे हल्ले, मारामारी, एनआरसी आंदोलनकर्त्यांवर खटले भरणं, खोट्या केस करून तुरूंगात टाकणं, बुलडोझर मोहीम इत्यादी घटना घडवून आणल्या गेल्या. २०२० ची उत्तर-पूर्व दिल्ली दंगल, २०२२ ला जहांगिरपुरीची दंगल, शिवाय देशभरात किरकोळ वादाची अनेक प्रकरणं घडली.

जानेवारी २०२० ला केंद्रीय मंत्री अनुराग ठाकुर यांनी केलेल्या 'गोली मारो सालोंको'च्या हेट स्पीचमुळे पुढच्या काहीच दिवसात दिल्लीत भीषण दंगल झाली. दंगलीचं सर्वेक्षण करणाऱ्या अनेक संघटनांनी ठाकुर यांच्या हेट स्पीचला दंगलीस जबाबदार धरलं. त्यांच्या प्रक्षोभक विधानामुळे ६० पेक्षा अधिक जीव गेले. कोट्यवधींच्या संपत्तीची नासधूस झाली. २०१३ साली मुजफ्फरनगरला झालेली भीषण दंगल कथित लव्ह जिहादच्या बोगस बातमीनं घडली होती. धर्मसंसदेतून थेट मुस्लीम समादायाला उद्देशून अशाच प्रकारची भाषा वापरली गेली. श्रद्धा वालकर प्रकरणानंतरही अशाच रीतीनं प्रक्षोभक भाषणे सुरू झाली. त्यातून निवडक प्रसिद्धीला आली. जी प्रसिद्धीला आली नाहीत त्यात चौका-चौकात, कॉलनीत, गल्लीत, टेरेसवर, गुप्त बैठकात, मिटिंगमध्ये मुस्लीम समुदायाविरोधात गैरसमज पसरवली जाणारी, त्यांच्याविरोधात हिंसक हल्ल्याची, घातपाताची विधानं केली जाणारी अनेक भाषणं होती.

कौटुंबिक हिंसा की प्रेमयुद्ध?

श्रद्धा वालकर प्रकरण कौटुंबिक हिंसाचाराचं प्रकरण होतं. तिला भीती होती, की आफताबकडून आपल्या जिवाला धोका आहे. तिने तसं आपल्या कुटुंबियांना कळवलं होतं. परंतु तिच्या तक्रारीची दखल घेतली गेली नाही. वेळीच तिची व्यथा ऐकली असती तर जीव गेला नसता. मृत श्रद्धाचे वडील विकास वालकर यांचाही हाच आरोप होता. त्यांनी ९ डिसेंबरला पत्रकार परिषद घेतली. त्यांनी वसई येथील तुळींज आणि माणिकपूर ठाण्यातील पोलिसांवर गंभीर आरोप केले. त्याचं म्हणणं होतं, सुरूवातीच्या काळात (२०२०) पोलिसांनी आपल्याला योग्य ते सहकार्य केलं नाही. त्याच वेळी पोलिसांनी दखल घेतली असती, तर माझी मुलगी आज जिवंत असती.

वास्तविक, श्रद्धाची हत्या पोलिसांच्या अकार्यक्षमतेमुळे झाली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत वेळीच कारवाई केली असती तर ही नृशंस घटना टळली असती. कौटुंबिक हिंसाचाराच्या अनेक प्रकरणात पोलीस योग्य ती कारवाई करत नाहीत. त्यामुळे देशात दिवसेंदिवस कौटुंबिक हिंसेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. जानेवारी २०२३ ला राष्ट्रीय महिला आयोगानं जारी केलेल्या आकडेवारीनुसार २०२२ मध्ये 'कौटुंबिक हिंसाचार' या श्रेणीत तब्बल ६,९०० पेक्षा अधिक तक्रारी नोंदवल्या गेल्या. आयोगानं नोंदवलेल्या ३०,९०० पेक्षा जास्त तक्रारींपैकी सुमारे २३ टक्के तक्रारी कौटुंबिक हिंसेच्या आहेत.

'टाइम्स ऑफ इंडिया'च्या मते, २०२० मध्ये महिलांविरुद्धच्या अत्याचाराच्या एकूण तक्रारींची संख्या सुमारे २३,७०० होती. मात्र केवळ एकाच वर्षात म्हणजे २०२१ मध्ये त्यात ३० टक्क्यांनी वाढ होत ही संख्या ३०,८०० पेक्षा जास्त झाली. २०२२ मध्ये घरगुती हिंसाचाराच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली. आयोगाच्या मते देशात सर्वाधिक प्रकरणं उत्तर प्रदेश, दिल्ली आणि महाराष्ट्र राज्यातून नोंदवली गेली आहेत. या संदर्भात योग्य कार्यवाही व अंमलबजावणी करण्याऐवजी राज्याचं महिला विकास खातं धार्मिक आधारावर झालेली लग्न मोडण्यात मग्न झालं आहे.

श्रद्धा वालकर प्रकरणी प्रतिक्रिया देताना २० डिसेंबरला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''आज 'लव्ह जिहाद'ची प्रकरणे वाढत असल्याचं सभागृहात जाणवलं. लव्ह जिहादच्या घटना महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात पहायला मिळतात. इतर राज्य सरकारांनी केलेल्या 'लव्ह जिहाद' विरोधातील कायद्यांचा अभ्यास करून महिलांच्या हिताच्या दृष्टीने योग्य तो निर्णय घेतला जाईल''. म्हणजे सरकारने कौटुंबिक हिंसेच्या गंभीर प्रकरणांकडे दुर्लक्ष करून आंतरधर्मिय विवाह होता कामा नये, यासाठी कंबर कसली आहे. वैवाहिक आयुष्यात आनंदी असणाऱ्या जोडप्याचे संसार मोडून राज्य शासन काय साध्य करू पाहत आहे? केवळ मुस्लीम द्वेषाच्या राजकारणातून व्यक्ती स्वातंत्र्य व खासगी आयुष्यात सरकार ढवळाढवळ करू पाहत आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या सूचनेनंतर भाजपशासित राज्यांनी कथित लव्ह जिहाद रोखण्यासाठी बेकायदेशीररित्या धर्मांतर बंदी विधेयक आणलं आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा, कर्नाटक, मध्य प्रदेश या राज्यांमध्ये हा कायदा लागू झाला आहे. या कायद्याचा उद्देश धर्मांतर रोखणे असा आहे. कायद्याच्या तरतुदीत मुलीचा धर्म बदलण्याच्या उद्देशाने केलेला विवाह रद्द होईल. शिवाय १० वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकते. जबरदस्तीने धर्मांतर केल्यास दीड वर्षांच्या तुरूंगवासासह १५,००० रुपये दंडाची तरतूद आहे. महिला अल्पवयीन असल्यास किंवा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीची असल्यास, ३ वर्षे ते १० वर्षांपर्यंत शिक्षा आणि २५,००० रूपये दंड होऊ शकतो. सामूहिक धर्मांतर करणाऱ्या संस्थांना ३-१० वर्षांचा कारावास आणि ५०,००० रूपयांचा दंड ठोठावला जाईल. जर कोणाला लग्नानंतर धर्म बदलायचा असेल तर त्याला दोन महिने आधी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावा लागेल.

मुळात अशा प्रकारचा कायदा घटनाबाह्य आहे. राज्यघटनेने दिलेल्या व्यक्ती स्वातंत्र्यात देशात कुठलाही नागरिक हवा तो धर्म स्वीकारू शकतो, त्याचा प्रसार करू शकतो. कायद्याने प्रौढ वयात प्रवेश केलेल्या कुठल्याही जाती-धर्माच्या स्त्री-पुरूषांना परस्परांशी विवाह करण्याचा अधिकार आहे. जात, राष्ट्रीयत्व किंवा धर्माच्या आधारावर तो काढून घेता येणार नाही. परंतु तत्सम विधेयकातून मुस्लीम समुदायाचं ध्रुवीकरण करणं व सामाजिक विभक्तीकरण करण्याचा हेतू आहे. या कायद्याचा सरळ-सरळ अर्थ असा, की तरूणींनी हिंदुंशिवाय इतर धर्मात प्रेमसंबंध व नातेसंबंध विकसित करता कामा नये. या उलट मुस्लीम तरुणींनी अशा प्रकारचे प्रेमविवाह केले तर त्याला घरवापसी म्हटलं जातं.

मिडीयादेखील अशा प्रकारच्या बातम्यांना धर्माच्या भिंती ओलांडून प्रेमविवाह केल्याचं संबोधत असतो. अशा लग्नाला वारेमाप प्रसिद्धी देतो. त्याचे वैगवेगळे पैलू समोर आणतो. या प्रसिद्धीमागे मुस्लीमांविरोधाची द्वेषभावना व धर्मांतराला प्रोत्साहित केल्याची सुप्त किनार जोडलेली असते. या उलट हिंदू मुलींनी असे विवाह केले, की कथित लव्ह जिहादचा आरोप करून त्या नवविवाहित तरूणाची व जोडप्याची यथेच्छ बदनामी केली जाते. त्यांचा मिडीया ट्रायल केला जातो. राखी सावंत व आदिल दुर्रानी या सेलिब्रिटींनी सात महिन्यापूर्वी केलेलं लग्न १० जानेवारीला घोषित केलं. त्यावेळी ट्विटरवर या जोडप्याला ट्रोल करण्यात आलं. मिडीयाने तिच्याविरोधात वेगवेगळ्या बातम्या लावल्या. (पुढे राखीबाई या लग्नाला स्टंटदेखील घोषित करण्याची शक्यता आहे.) त्या बातम्यांचा उद्देश 'हिंदू विरुद्ध मुस्लीम' असाच होता. राखीचा विवाह हा पहिला असा सेलिब्रिटीचा लग्नसोहळा असेल, ज्यावर मिडीयाने कथित लव्ह जिहादसारखी शंका उपस्थित केली. यापूर्वी कुठल्याच सेलिब्रिटीच्या लग्नाच्या वेळी असा विखारी प्रचार राबवला नव्हता.

द्वेषमूलक अफवातंत्र

संघ विचारांचे प्रमोद मुतालिक आणि बाबू बजरंगी या अफवा तंत्राचे बिणीचे शिलेदार आहेत. २००९ साली प्रमोद मुतालिकने 'रोमियो जिहाद'चा काल्पनिक मुद्दा उपस्थित करत चर्चा सुरू केली. तत्पूर्वी १९२० साली आर्य समाजानं ही अफवा पसरवली होती. हैदराबाद संस्थानात आर्य समाजींनी हा मुद्दा उपस्थित करत मुस्लीम महिलांची बळजबरीने धर्मांतरे घडवून आणली होती. सद्यस्थितीत विशिष्ट योजनेचा भाग म्हणून मुस्लीम अशी कृत्ये करतात, असा भास निर्माण करून तो पटवून देण्याचा हा प्रकार असतो. हिंदू मुली बावळट असतात आणि त्या सहज फसतात, अशा प्रकारचा संकेत देखील यातून देण्यात येतो.

अर्थात हिंदू मुलींमध्ये निर्णय क्षमतेची कमतरता, निर्बुद्धपणा असतो असं देखील प्रत्यक्षरित्या या आरोपातून प्रतीत केलं जातं.

वास्तविक लव्ह जिहादसारखा कुठलाही प्रकार अस्तित्त्वात नाही, अशी कबुली केंद्र सरकारने संसदेत दिली आहे. ४ फेब्रुवारी २०२० ला केंद्रीय गृह राज्यमंत्री जी. किशन रेड्डी यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात माहिती दिली, की लव्ह जिहाद सारखी कोणतीही संज्ञा सध्याच्या कायद्यांतर्गत परिभाषित केलेली नाही. त्यासंबंधीचं कोणतंही प्रकरण केंद्रीय संस्थांच्या निदर्शनास आलेलं नाही. एवढंच नाही तर सरकारने संसदेत म्हटलं, कोणत्याही केंद्रीय एजन्सीद्वारे 'लव्ह जिहाद'ची कोणतीही घटना नोंदवली नाही.

अखिला अशोकन प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्थेने ऑगस्ट २०१७ ला, अशा प्रकरणांमध्ये धर्मांतराचा प्रयत्न किंवा सक्तीचा कोणताही पुरावा नाही, असं घोषित केलं आहे. २००९ नंतर हिंदू राष्ट्रवाद्यांनी आक्रमकरित्या मुस्लीम विरोधी प्रचार केला. त्याचाच एक भाग म्हणून या अफवेला बळकटी देण्यात आली. अफवा व अपप्रचार या शिवाय दुसरं काहीही यात आढळलं नाही. प्रसिद्धी माध्यमाच्या मते, मुतालिकच्या आरोपाचा कर्नाटक सीआयडीने तपास केला. तपासाअंती लव्ह जिहाद अस्तित्त्वात नसल्याचा निष्कर्ष संस्थेने मांडला. २०१४ मध्ये अलाहाबाद हायकोर्टाने संबंधित याचिकेवर सुनावणी करत 'लव्ह जिहाद' शब्दाच्या वापर थांबविण्याचा निर्वाळा दिला. त्याचं कारण देत कोर्टाने म्हटलं, ''हा शब्द एक विशिष्ट जनसमूहाच्या विरोधात जनभावना भडकावतो''. परंतु या दुष्प्रचारात चिकाटी व सातत्य ठेवल्याने सामाजिक विभक्तीकरणाचा त्यांचा अजेंडा मात्र यशस्वी झाला.

कथित लव्ह जिहादसारखी द्वेषमूलक, चिथावणीखोर आणि बुद्धीभेद करणारी जाहीर भाषणं, मिडीयाच्या आधारे पसरवली जातात. अनेकांना ही विखारी नीती समजू शकत नाही. परिणामी तो घटक द्वेषमूलक आणि बुद्धीविरोधी प्रचारतंत्राला बळी पडतो.

विविध जाती-धर्म-संप्रदायातील स्त्री-पुरूषांमधील प्रेम प्रकरणं आणि विवाह ही भारतात सामान्य बाब आहे. कारण इथला समाज बहुधर्मीय आहे. तो आपापल्या जाती-धर्म-पंथासह सहजीवनात राहतो. (सहजीवनामुळे ट्यूनिशिया, इंडोनेशिया सारख्या काही देशात आंतरधर्मीय लग्न कायदेशीर आहेत.) मात्र, लव्ह जिहादची व्याख्या करून हिंदू राष्ट्रवाद्यांकडून सांप्रदायिक अजेंडा राबवला जातो. नित्य चर्चा घडवून मुस्लीम समुदायाचं राक्षसी चित्र रंगवलं जातं. हे राजकीय मतांसाठी ध्रुवीकरण असलं तरी याचे दीर्घकालीन परिणाम भारताच्या सद्भावनेच्या परंपरेवर पडत आहेत. भारतात हजारो वर्षापासून बहुसंस्कृतिक परंपरा आहे. परंतु मानवताविरोधी भूमिकेसाठी प्रसिद्ध असलेला राजकीय पक्ष आणि त्यांच्या सहयोगी संघटना सामाजिक सलोखा बिघडवून सामाजिक अशांतता पसरवत आहेत. ही बहुवैविध्य भारताची अपरिमित हानी आहे. त्याला व्होट बँकेच्या पलीकडे जाऊन विचार करावा लागेल. हे केवळ देशाच्या राजकीय संस्कृतीवर आलेलं केवळ आक्रमणाचं संकट नसून वैविध्याने नटलेल्या भारतीय परंपरेवर ओढवलेली ही भयंकर आपत्ती आहे, हे लक्षात घ्यायला हवं.

(लेखक सामाजिक विषयाचे चिंतक आहेत.)

– कलीम अजीम

ई. मेल : kalimazim2gmail.com

'सत्याग्रही'साठी आपले लेखन पाठवा.

- नव्या दमाचे, ताजे, तुमच्या शैलीतले.
- मनमोकळे, स्पष्ट, परखड, मुद्देसूद.
- सभोवतालच्या परिस्थितीवर अचूक भाष्य करणारे. • भ्रष्ट राजकारण, मनमानी नोकरशाही, उदारीकरणाच्या नावाखाली चालणारा वसाहतवाद यावरील प्रतिक्रिया. • दारिद्रय, बेरोजगारी, गुंडगिरी, शोषण यांचे अस्वस्थ करणारे सच्चे अनुभव. • वाऱ्याच्या झुळकीसारखी वाटणारी एखादी सुखद घटना. • नर्म विनोदी पद्धतीची चुरचुरीत आठवण. • कथा, कविता, अनुवाद, व्यक्तिपर लेख, ललित असे काहीही. • सारे काही सत्याग्रही परिवाराला साजेसे. • पानाच्या एका बाजूस, समास सोडून सुवाच्च अक्षरांत आमच्याकडे लिहून पाठवा. **ई-मेलवरही आपले लेखन पाठवू शकता.** • चांगल्या मजकुराला सत्याग्रहीत निश्चित प्रसिद्धी दिली जाईल.
- आपले सहकार्य 'सत्याग्रही'साठी मोलाचे आहे.

वर्धापन विशेष

आंतरजातीय विवाहाचं पाऊल उचलताना...

प्रा. डॉ. नंदा पाटील

महाराष्ट्र सरकारने नुकताच आंतरजातीय तसेच आंतरधर्मीय विवाह केलेल्या तरूण-तरूणींची नोंद केली जाणार असल्याचा जीआर काढला. या शासन आदेशावर टीका झाल्यानंतर सरकारने सांगितलं, की आम्ही कोणावरही पाळत ठेवणार नसून आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांची नोंद करून घेणं आणि त्यांना संरक्षण देणं हा यामागचा हेतू आहे. परंतु या निर्णयामागे आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहाला संरक्षण देणं हा सरकारचा हेतू दिसत नाही. वास्तविक आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाहामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या कक्षा रुंदावल्या जातात. आपल्याला जर व्यापक व्हायचं असेल, आपली चौकट ओलांडायची असेल, आधुनिक मूल्यं स्वीकारायची असतील तर निश्चित आवडत्या व्यक्तीशी आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह ही आयुष्यातील महत्त्वाची गोष्ट ठरू शकते. माझा स्वत:चा आंतरजातीय विवाह आहे. मला कोणत्या परिस्थितीला सामोरं जावं लागलं हे पाहिलं तर जातीचा विचार अजूनही किती खोलवर रूजलेला आहे, याची कल्पना येते.

आमच्या लग्नाला ४० वर्षे झाली. काळ किती पट्कन पुढे सरकतो...आमचे लग्न झाले तेव्हा वाटले होते, की काळाबरोबर जात संपून जाईल. पण तसे होताना दिसत नाही. आज जात जास्तच बोलायला लागली आहे. खरे तर त्यामुळे आपली प्रगती खुंटते आहे, असे कुणाला वाटतच नाही.

प्रत्येक मानवी जीवनात एक टर्निंग पॉईंट असतो. त्या एका गोष्टीमुळे जीवन आमूलाग्र बदलून जाते. एक नवीन आयुष्य, नवी ओळख बनवून देते. माझे लग्न हाच माझ्या आयुष्यातील टर्निंग पॉईट आहे. मी अशा घरात वाढले, की वडील जरी समाजवादी विचाराचे होते तरी घरात पुरूषी वर्चस्व होते. पण अपवाद म्हणून माझ्या बाबतीत सगळे नियम शिथिल होते. त्यामुळे माझे प्रचंड लाड झाले. खरं तर माझ्या वडिलांनी म्हणजे आबांनी माझे संगोपन मुलासारखे केले. त्यांचं लग्न झाल्यानंतर मी नऊ वर्ष उशीराने जन्माला आले. माझ्या पाठीवर पण १२ वर्षांनी बहीण झाली. नंतर दोन भाऊ. त्यामुळे माझे सगळे हट्ट पुरवले गेले. थोडक्यात काय, तर मी म्हणेल त्याला वडील 'हो' म्हणायचे. पोशाखाच्या बाबतीतही असेच. आम्ही खेड्यात रहात होतो. पण मुंबई मधील पहिला फॅशनेबल ड्रेस आमच्या घरी आणि तो मला असायचा...

आमच्या घरी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील लोकांची सतत ये-जा असायची. त्यावेळी मी बैठकीत बसून त्यांच्या चर्चा ऐकत असे. बैठकीत माझी ये-जा असायची. मला कधी टोकले गेले नाही. माझ्या खूप मैत्रिणी घरी यायच्या. त्या सगळ्या जाती-धर्मातील होत्या. त्यांनाही कधी कुणी अडवलं नाही. असंच छान मोकळ्या वातावरण मी वाढत होते. वडिलांना प्रश्न विचारत होते. आमच्या दोघात खूप

छान संवाद होता. माझ्यावर त्यांची खूप माया होती. एक गंमत सांगते, मी तेव्हा इयत्ता चौथीत होते. आम्ही मळ्यात रहायचो. गावापासून ३ ते ४ कि. मी. लांब. रस्ता मातीचा, फुफुटाचा... एप्रिलमध्ये शाळा सकाळी असायची. ती १२ वाजता सुटायची. एकदा माझी चप्पल शाळेतून हरवली आणि मी घरी अनवाणी चालत येत होते. मध्येच आबा भेटले. माझ्या चपला कुठे आहेत म्हणून त्यांनी चौकशी केली. कच्च्या रस्त्यावरील फुफुटामध्ये माझे पाय भाजतायत हे त्यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी पट्कन मला उचलून खांद्यावर घेतलं. रस्त्यावर त्यांना कोणी ना कोणी सारखं भेटत होतं. त्यामुळे वेळ लागत होता. एके ठिकाणी जास्त वेळ लागला. तेव्हा त्यांनी मला खाली उतरवून आपल्या धोतराचा सोगा सोडला आणि तो खाली टाकून त्यावर मला उभे केले. माझे पाय भाजू नयेत म्हणून... अजून एक गंमत मी लहान असतानाची. मध्यरात्री मी रडत होते. मला भूक लागली म्हणून आई-आबा दोघेही समजावत होते, भाकरी-भाजी खा,दूध-भात खा, गुळ-तूप चपाती खा...तर मी आपली रडतच होते आणि म्हणत होते, ''मला याची नाही भूक लागली''. ''मग कशाची भूक लागली?'' दोघांचा प्रश्न... मी आपलं रडतंच ...जिलेबीची भूक लागली आहे, असं सांगितलं. आबा मला समजावत होते. पण मी ऐकत नव्हते. अखेर ते उठले आणि गावात गेले. गावातील हॉटेलवाल्याला उठवलं आणि जिलेबी घेऊन आले. तोपर्यंत मी रडून झोपले होते. त्यांनी मला झोपेतून उठवलं आणि जिलेबी खायला घातली. दुसऱ्या दिवशी आचारी बोलावून जिलेबी तयार केली आणि मला मनसोक्त जिलेबी खायला घातली. माझे लग्न होईपर्यंत ते माझा वाढदिवस खूप मोठा ...म्हणजे स्पीकर लावून, गावातील खूप लोकांना बोलावून, जेवायला घालून साजरा करायचे.

__प्रश्न हा मनात येतो, की जात एवढी मनात, विचारात कशी ठाण मांडून बसते? मला तर वाटतं, की जातीव्यवस्था ही अमानुषच आहे. जातीच्या उतरंडीनुसार व्यक्तीची सामाजिक ओळख होताना स्त्री-पुरूष ही लिंगभेदाची भक्कम भिंतही अस्तित्त्वात येते. जातीव्यवस्थेच्या पहिल्या बळी प्रामुख्याने स्त्रिया ठरतात. एकदा स्त्रियांना दाबून ठेवलं, की मग संस्कृती, सभ्यता, शिष्टाचार, परंपरा अशा गोंडस नावाखाली शोषण चालूच राहतं. हे कुठं तरी थांबायला हवं.__

शाळा-कॉलेजमध्ये मी खेळात, नाटकात, डान्समध्ये भाग घायची. मला आबांनी कधीच अडवलं नाही. उलट प्रोत्साहनंच दिलं. पण जेव्हा माझा जोडीदार मी स्वतः निवडला आहे, हे समजल्यावर... ते खूप शांत होते. ही वरवरची शांतता होती. ते मला खूप छान समजून सांगत होते. जातीबाहेर लग्न करण्याचे तोटे काय काय असू शकतात, हे सांगत होते. मीही तितक्याच शांतपणे ऐकत होते. ते जसे त्याच्या विचारांवर ठाम होते. तशीच मीही माझ्या विचारावर ठाम होते. हे सगळे बोलणे रात्री उशिरा सुरू झाले ते पहाटेपर्यंत चालूच होते. तेही शेताच्या बांधावर बसून. कारण त्यांनी जेव्हा मला विचारले, ''मी ऐकले आहे ते खरे आहे का? तू रवीशी लग्न करणार आहेस?'' मीही न घाबरता 'हो' म्हणाले. खरं तर त्यामुळेच त्यांची पंचाईत झाली होती. धड त्यांना रागावता येत नव्हते, की मला मारताही येत नव्हते. वाईटही बोलता येत नव्हते.

मी त्यांना एवढंच म्हणाले, ''तुम्ही माझं लग्न लगेच ठरवू नये. माझं शिक्षण पूर्ण होईपर्यंत थांबावं''.

आमचं एकत्र कुटुंब. चार काका, काकू, आम्ही आठ-नऊ भावंडं. घरातील वातावरण ढवळून निघालं होतं. कुणीच माझ्याशी बोलत नव्हतं. मी मात्र काहीच घडलं नाही, असं दाखवण्याचा प्रयत्न करत होते. संध्याकाळी मोठे काका आणि आबा बाहेरून आले ते माझं लग्न ठरवूनच...

हा मलाच काय, सगळ्यानाच धक्का होता. लग्नाची तारीखही ठरली होती. माझ्या चुलत बहिणीचं लग्न होतं. त्याच तारखेला, त्याच दिवशी, एकाच मंडपात लग्न करण्याचं ठरविलं होतं.

मी खूप अस्वस्थ झाले होते. ज्या आबांनी माझ्यावर जीवापाड प्रेम केलं. माझा प्रत्येक हट्ट पुरवला. मला तळहाताच्या फोडासारखं जपलं. ते आबा माझ्या आयुष्याचा जोडीदार मी निवडला आहे म्हटल्यावर असं कसं वागू शकतात? मुलीपेक्षा जात एवढी प्रिय असू शकते का? माझ्या मनात विद्रोहाची ठिणगी हळूहळू फुलू लागली..आबांचे खरे रूप समोर आले. जे आबा माझ्याशी प्रेमाने वागत होते. ते आईशी मात्र कठोर वागत होते. त्यावरून मी त्यांच्याशी वादही घालायचे. बायकोनं गुलामासारखंच राहिलं पाहीजे, असंच त्यांचं वागणं असायचं. प्रसंगी ते आईवर हातही उचलायचे. मी त्यांना याचा जाबही विचारायची. वय वाढत होतं तसंतसं हे जास्त प्रकर्षानं जाणवायचं. मी त्यावेळी त्याच्याशी बोलायची नाही. आमचा संवाद बंद व्हायचा.

माझ्या मनात द्वंद्व सुरू झालं. आजुबाजूला स्त्रियांची अवस्था अशीच होती. मला यातून मुक्त होण्यासाठी स्वतंत्रपणे एक युद्धच, विद्रोह करावा लागणार. आपल्या नाडीच्या ठोक्यावरची ,आपल्या स्वतः वरची किंबहुना आपल्या एकूण अस्तित्त्वावरची अनिष्ट बंधनं तोडणं, आपल्याला गुदमरून टाकणारी दडपणं झुगारून देणं एवढीच प्रेरणा होती. कोणावर सूड उगवणं, कोणाचा द्वेष करणं, कुणाच्या भावना पायदळी तुडवणं यासाठी हा विद्रोह नव्हता. माझ्यावर लादण्यात आलेली बंधनं तोडण्यासाठी, स्वतःच्या आविष्कारासाठी माझ्याभोवती जे कुंपण घातलं जात होतं, त्यासाठी हा विद्रोह...

मनाने विद्रोहाची तयारी केली. मी रवीशी लग्न केलं आणि आमचं सैराट झालं. आमचं लग्न 'समाजवादी प्रबोधनी, इचलकरंजी' इथं आचार्य कॉम्रेड शांताराम गरूड, आदरणीय कॉ. गोविंद पानसरे, बापूसाहेब मगदूम, शंकर पुजारी यांच्या उपस्थितीत फक्त पाच रूपयांमध्ये झालं. कोणताही विधी नाही, हार–फुलं नाहीत. फक्त दोन वाक्यं...'एकमेकांना आयुष्यभर सुखात, दुःखात साथ देऊ आणि एकमेकांचा आदर करू'. विशेष करून रवीनं सांगितलं, ''स्त्रीचा मी सन्मान करेन''.

आता खऱ्या अर्थाने संघर्षाला सुरूवात झाली. ज्या आबांनी मला फुलासारखं जपलं होतं त्यांना आता माझं रक्त हवं होतं. ते आता माझ्या जीवावर उठले होते. एवढे ते कसे काय क्रूर झाले? खरं तर रवींद्र हा त्याच्या सख्ख्या, जवळच्या मित्राचाच मुलगा होता. आम्ही लहानपणापासून एकत्र वाढलो होतो, खेळलो होतो. एकमेकांच्या घरी राहिलो होतो.

माझे मोठे दीर आणि मित्रमंडळी मदतीला होती. पण थोडे दिवस. कारण त्यांनाही दम देण्यात आला... तीन महिने रोज नव्या ठिकाणी मुक्काम. कुठंच दोन दिवसांपेक्षा जास्त दिवस नाही थांबलो. दोघांपैकी एकाला तरी मारायचं, अस माझ्या माहेरच्या घरी ठरलं होतं. माझा मोठा चुलतभाऊ यामध्ये प्रामुख्याने पुढे होता. तो स्वत: पैलवान व त्याचे मित्रही पैलवान. आम्ही जिथं जिथं मुक्काम केला, तिथं ते पोहोचले. बापू बिरूला सुपारी द्यायला गेले. पण त्यांनी सुपारी घेतली नाही हा भाग वेगळा...आदरणीय एस. एम. जोशी, डॉ. कुमार सप्तर्षी, इचलकरंजीला समाजवादी प्रबोधनीमध्ये व्याख्यानासाठी आले होते. त्यांना हे सगळं समजलं. ते सगळे म्हणजे शांताराम गरूड, एस. एम. जोशी, डॉ. कुमार सप्तर्षी आबांना भेटायला, समजवायला गेले. पण त्यांनी त्यांचंही ऐकलं नाही. मात्र त्यांना आबांनी शब्द दिला. तिच्या केसालाही धक्का लागणार नाही. पण आजपासून ती मला मेली आणि मी तिला मेलो. तेही अण्णा ! (एस. एम. जोशी) तुम्ही इथंपर्यंत आला आहात म्हणून. मरेपर्यंत तो शब्द त्यांनी पाळला. ते शेवटपर्यंत माझ्याशी बोलले नाहीत. माझ्या मैत्रीणीने एकदा विषय काढला तर तिला म्हणाले, ''माझे तिच्यावर पूर्ण लक्ष आहे''.

प्रश्न हा मनात येतो, की जात एवढी मनात, विचारात कशी ठाण मांडून बसते? मला तर वाटतं, की जातीव्यवस्था ही अमानुषच आहे. जातीच्या उतरंडीनुसार व्यक्तीची सामाजिक ओळख होताना स्त्री–पुरूष ही लिंगभेदाची भक्कम भिंतही अस्तित्त्वात येते. जातीव्यवस्थेच्या पहिल्या बळी प्रामुख्याने स्त्रिया ठरतात. एकदा स्त्रियांना दाबून ठेवलं, की मग संस्कृती, सभ्यता, शिष्टाचार, परंपरा अशा गोंडस नावाखाली शोषण चालूच राहतं. हे कुठं तरी थांबायला हवं.

खरं तर सामाजिक परिवर्तन म्हणजे बदल झाला पाहिजे. जात नको असेल तर स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेवर, स्त्री–पुरुष समानता यावर आधारित, निर्णय प्रक्रियेत स्त्रियांना स्थान, व्यक्ती स्वातंत्र्य असेल तर असा समाज नक्कीच आदर्श समाज असेल.

(लेखिका निवृत्त प्राध्यापिका आहेत.)

– प्रा डॉ नंदा पाटील
ई–मेल : nandapatil1626@gmail.com

वर्धापन विशेष

सरकार दिशा चुकतेय...

सतीश देशपांडे

> *हिंदुत्ववादी संघटना या देशांमध्ये अल्पसंख्याकांना टार्गेट करीत आहेत. त्यांच्याशी संबंधित राजकीय पक्ष आपली पोळी भाजत आहे. गुजरात आणि उत्तर प्रदेशमध्ये धार्मिक द्वेषाचे वातावरण निर्माण केले. त्यातून राजकीय विजय प्राप्त केला. तसा राजकीय विजय इतर राज्यांमध्ये त्यांना मिळवायचा आहे. हिंदू धर्मावरती अन्याय होतोय, हिंदू धर्मातल्या लोकांना ख्रिश्चन आणि मुस्लीम धर्मीय लोक आमिष दाखवून धर्मांतरित करत आहेत, हिंदुंच्या मुलींशी लग्न करून त्यांचे धर्मांतर घडवून आणले जात आहे, अशी आवई उठवली जाते. लोकांना जितके म्हणून जात-धर्माच्या चौकटीत अडकवून ठेवता येईल तितके ते अडकवून ठेवत आहेत. सरकारचा अल्पसंख्यक समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अतिशय संकुचित आहे. नागरिकत्व दुरूस्ती अधिनियम म्हणजे सीएए कायद्याच्या वेळी आपण हे पाहिले. महाराष्ट्रात आंतरधर्मिय विवाहांबाबत समिती नेमण्याच्या निर्णयामागेही वेगळाच दृष्टीकोन आहे. वास्तविक आम्हा युवक-युवतींना कुठल्याही स्वरूपाचा जातीय, धार्मिक द्वेष नको आहे. आम्हाला एक शांततावादी समतामय समाज हवा आहे, की ज्या समाजामध्ये आम्ही सर्व माणूस म्हणून उजळ माथ्याने वावरू शकू.*

काही दिवसांपूर्वी श्रद्धा वालकर या तरूणीची हत्या झाली. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी हा त्या तरूणीचा प्रियकर असून तो सध्या अटकेत आहे. त्यासंबंधी कोर्टात केस चालू आहे. या घटनेमुळे सर्वांनाच दु:ख झाले. खरे तर गुन्हेगारी जगतासंबंधी आपल्या आजुबाजूला अनेक घटना-घडामोडी घडत असतात. परंतु अलीकडच्या काळामध्ये मात्र गुन्हेगारीला धार्मिक रंग देऊन सामाजिक वातावरण गढूळ केलं जात आहे. एखाद्या गुन्ह्यामध्ये आरोपी किंवा गुन्हेगार हा अल्पसंख्यक... विशेषत: मुस्लीम, ख्रिश्चन धर्मीय आहे असे दिसले, की प्रकरण उकरून काढले जाते. त्याबद्दल वृत्तवाहिन्यांतून, समाजमाध्यमांतून गैरसमज पसरवले जातात. धार्मिक अजेंडा घेऊन काम करणाऱ्या हिंदुत्ववादी संघटना मोर्चे काढतात, आंदोलने करतात. राजकीय नेते मंडळी बेताल वक्तव्ये करतात आणि संपूर्ण सामाजिक वातावरण गढूळ करून टाकले जाते. प्रत्येक गोष्ट हिंदू विरुद्ध मुस्लीम किंवा हिंदू विरूद्ध इतर अल्पसंख्यक या चष्म्यातून पाहायची आणि आपला राजकीय अजेंडा पुढे रेटून अल्पसंख्यक समाजाला जाणूनबुजून लक्ष्य करायचे, हा उद्योग अलीकडच्या काळात जोमाने चालू आहे. श्रद्धाच्या हत्येबाबत हेच चालू आहे. यातील मुख्य आरोपी अफताब पुनावाला हा मुस्लीम असल्याचे आणि तेच या घटनेमागच खरे कारण आहे, असे चित्र रंगवण्याचा काही मंडळींनी प्रयत्न केला. पण तो फसला. महाराष्ट्रातील काही हिंदुत्ववादी संघटनांनी आणि भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी या प्रकरणाला लव्ह जिहादचा रंग दिला आहे. आपल्या मुलींवर कशा पद्धतीने संस्कार करायला हवेत, मुलींनी कसे वागायला हवे, मुलींवर कशा पद्धतीने घरातल्या पालकांनी लक्ष ठेवायला हवे, लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहता कामा नये, वगैरे उपदेश व प्रवचने सुरू झाली आहेत.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने एक पाऊल उचलले. आंतरजातीय तसेच आंतरधर्मीय विवाह केलेल्या तरूण-तरूणींची नोंद केली जाणार असल्याचा जीआर काढला. या शासन आदेशावर टीका झाल्यानंतर सरकारने अशी सावरासावर केली, की आम्ही कोणावरही पाळत ठेवणार

नसून आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांची नोंद करून घेणे आणि त्यांना संरक्षण देणे हा यामागचा हेतू आहे. परंतु सरकारचे हे स्पष्टीकरण धादांत खोटे वाटते. या निर्णयामागे आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहाला संरक्षण देणे हा सरकारचा हेतू बिलकुल नाही. सरकारला लव्ह जिहाद विरोधी कायदा करायचा आहे आणि या कायद्याची पार्श्वभूमी सरकार तयार करत आहे, हे यातून उघडपणे दिसून येते. केंद्रातील आणि राज्यातील सरकार हे हिंदुत्ववादी विचारसरणीचे सरकार आहे. एकीकडे समान नागरी कायद्याची चर्चा घडवून आणायची आणि त्याच्या आडून लव्ह जिहाद आणि धर्मांतर विरोधी कायदा पुढे रेटायचा, हा या सरकारचा छुपा अजेंडा आहे. महाराष्ट्र राज्यात हे दोन कायदे अस्तित्त्वात आणण्यासाठी वातावरण निर्मिती चालू आहे, असे म्हणता येईल.

छुपा अजेंडा राबविण्यासाठीचा उपद्व्याप

आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहाला भारताच्या स्वातंत्र्यापासून कायदेशीर संमती आहे. भारताच्या राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्यत्रयी दिलेली आहे. स्वतःचा जोडीदार निवडणे, त्या जोडीदारासोबत संसार करणे याचे निखळ स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकाला राज्यघटनेनेच दिलेले आहे. १९४८ सालचा संयुक्त राष्ट्रांचा मानवी हक्क विषयक जागतिक जाहीरनामादेखील जगातील प्रत्येक नागरिकाला स्वतःचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य बहाल करतो. धोरण आणि कायद्याच्या पातळीवर ती मान्यता असली तरीही आंतरजातीय-आंतरधर्मीय म्हणजेच मिश्र विवाहाला समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर मान्यता नाही. कारण आपला समाज हा जात आणि धर्मामध्ये मोठ्या प्रमाणावर विभागला गेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राम मनोहर लोहिया यांनी जातीय विषमतेच्या साखळ्या तोडून टाकण्यासाठी आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहाला प्रोत्साहन दिले. देशातील सामाजिक विषमतेच्या प्रश्नाचे निर्मूलन व्हावे यासाठी महात्मा गांधीजी केवळ मिश्र विवाहालाच उपस्थित राहत. जे विवाह सजातीय आहेत, अशा विवाहांना गांधीजी जात नसत. आज समाजामध्ये जातीयता संपलेली आहे असे बिलकूल नाही. समाजात छुपा जातीयवाद मोठ्या प्रमाणावर आहे. प्रत्येक जातीचे संघ आहेत. हेच संघ पुढच्या पिढ्यांच्या विकासासाठी मारक आहेत. जाती निर्मूलनासाठीचा एक महत्त्वाचा उपाय म्हणून आंतरजातीय विवाहाकडे पाहायला हवे. धार्मिक विषमतेला मूठमाती देण्यासाठी, सर्वधर्मसमभाव निर्माण होण्यासाठी आंतरधर्मीय विवाहाकडे सकारात्मक पद्धतीने व उदारपणे पहायला हवे.

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह करू इच्छिणाऱ्यांस प्रोत्साहन देणे आणि ज्यांनी असा विवाह केला आहे त्यांना आधार देणे, हे सरकारचे कर्तव्यच आहे. त्यानुसार सरकारच्या काही प्रोत्साहनपर योजनाही आहेत. मात्र आता जो नवा जीआर काढण्यात आलेला आहे, त्यामुळे सरकारचा प्रवास उलट्या दिशेने सुरू असल्याचे लपून राहत नाही. सरकारच्या या जीआरची सद्यस्थितीत कुठल्याही स्वरूपाची आवश्यकता दिसत नाही. कुठलीही गरज नसताना आपला छुपा अजेंडा राबविण्यासाठी सरकार हे उपद्व्याप करत आहे. आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांवर विशेषतः हिंदू-मुस्लीम आणि हिंदू-ख्रिश्चन असा विवाह करणाऱ्यांवर पाळत ठेवण्याचा हा प्रकार असावा, असा संशय घेण्यास पुरेशी जागा आहे. सररकारची ही कृती समतेच्या तत्त्वांच्या विरोधात आहे.

माझा आंतरजातीय विवाह

मे २०१५ मध्ये मी अश्विनी या माझ्या मैत्रिणीशी विवाह केला. आम्हा दोघांचीही जात भिन्न आहे. आम्हा दोघांची भेट 'युवक क्रांती दला'मध्ये घडून आली. या भेटीतून मैत्रीचे सूर जुळले आणि मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. आम्ही पती-पत्नी म्हणून एकत्र येण्याचे ठरवले. मात्र, हा निर्णय केवळ भावनेच्या भरात घेतला नाही तर तो विवेकाने घेतला. हा निर्णय घेताना मला आणि माझ्या पत्नीला डॉ. कुमार सप्तर्षी, डॉ. उर्मिला सप्तर्षी, अन्वर राजन, डॉ. श्रीपाल सबनीस, संदीप बर्वे आणि युवक क्रांती दलाच्या अनेक कार्यकर्त्यांची मदत झाली. आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह म्हटला, की घरातून विरोध होणे साहजिक आहे. कारण आई-वडिलांची, पालकांची आणि नातेवाईकांची सामाजिक पार्श्वभूमी पुरोगामी असतेच असे नाही. मात्र आपण रोमँटिक वातावरणातून थोडे बाहेर पडून विवेकी

विचार करणे, आपल्या विचारांवरती ठाम असणे, पालकांशी सुसंवाद साधणे आणि भविष्यात एकत्रित आल्यानंतर दोघांनी समविचाराने सहजीवन जगणे हे विचार स्पष्ट असले तर आपला निर्णय हा निश्चित योग्य ठरतो. हा प्रत्यक्ष अनुभव मी घेतो आहे. अनेक तरूण मुलं-मुली अशी आहेत, की ज्यांना आमच्यासारखा प्रेमविवाह करायचा आहे. पण दोघांची जात किंवा धर्म भिन्न आहे म्हणून आई-वडिलांचा, नातेवाईकांचा पाठिंबा नाही. या कारणामुळे ते एकत्र येऊ शकत नाहीत. अशा अनेक तरूण-तरूणींना वैचारिक पाठिंबा देणं, त्यांना समजून घेणं, त्यांच्या कृतीमध्ये सोबत करणं ही समाज म्हणून आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. सरकार म्हणून असा विवाह करणाऱ्या तरूण-तरूणींना प्रोत्साहन देणं, आधार देणं ही सरकारची जबाबदारी आहे.

आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाहानंतर चांगल्या प्रकारे सहजीवन जगणे ही एक मोठी जबाबदारी असते. माझा व्यक्तिगत अनुभव असा आहे, की आपण जर जात-धर्म यातून निर्माण होणाऱ्या विषमता, श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव मानत नसू, स्त्री-पुरुष समानता मानत असू, तर निश्चित आपले सहजीवन आनंदी होते. घरातील छोट्या-मोठ्या कामांपासून ते घरातल्या महत्त्वाच्या निर्णयापर्यंत आपण समानता आणि मैत्रभाव ठेवायला हवा. आपल्या आंतरजातीय विवाहाला नावं ठेवणारे अनेक लोक असतात. पण अशा प्रवृत्तींकडे दुर्लक्ष करणं आणि आपले समताधिष्ठित सहजीवन जगत राहणं आपल्या हाती आहे. मला विवाहानंतर सुरूवातीच्या काळातील काहीसा विरोध सोडला, तर त्यानंतर समाजामध्ये वावरत असताना आंतरजातीय विवाह केला म्हणून कुठेही विरोध झाला नाही किंवा कमीपणाची वागणूक मिळाली नाही. आपण जर आपल्या निर्णयावर ठाम असू, आपण आपल्या निर्णयाशी प्रामाणिक असू आणि आपले वर्तन जर नीतिमूल्यांच्या आधारे असेल, आपण आपल्या सामाजिक-आर्थिक जीवनामध्ये सातत्याने प्रगती करत असू, तर निश्चितच समाजाचा आपल्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. हा दृष्टिकोन माझ्यामध्ये निर्माण होण्यास 'युवक क्रांती दल' आणि 'सत्याग्रही विचारधारा' मासिक यांची महत्त्वाची भूमिका आहे.

आंतरजातीय विवाहाचा व्यक्तिगत आयुष्यामध्ये आपल्याला फायदाच होतो. यातून आपली संस्कृती ही खऱ्या अर्थाने वैविध्यपूर्ण होते. सणवार, रीतीरिवाज, परंपरा यांचे वैविध्य आपल्याला अनुभवायला मिळते. आपल्या परिचितांची, पै पाहुण्यांची संख्या तर वाढतेच; परंतु भिन्न पार्श्वभूमी असणारे आपण नातेवाईक म्हणून एकत्र येतो. ज्यावेळी आपण जातीचा विचार करून विवाह करतो, त्यावेळी आपले वर्तुळ एका छोट्या मर्यादेतच राहते. मात्र आंतरजातीय किंवा आंतरधर्मिय विवाहामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या कक्षा रुंदावल्या जातात. आपल्याला जर व्यापक व्हायचे असेल, आपली चौकट ओलांडायची असेल, आधुनिक मूल्ये स्वीकारायची असतील तर निश्चितच आवडत्या व्यक्तीशी आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह ही आपल्या आयुष्यातील महत्त्वाची गोष्ट ठरू शकते. आज माझ्या कुटुंबामध्ये आम्ही सर्व आनंदाने राहतो. दोन भिन्न सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील आम्ही नातेवाईक म्हणून एकत्र आलो आहोत. आमच्या कुटुंबाचा खऱ्या अर्थाने सांस्कृतिक विस्तार झालेला आहे.

आंतरजातीय विवाहास होणारा विरोध

समाजामध्ये जातीच्या संकल्पना खोलवर रूजलेल्या आहेत. जात कोणतीही असो, प्रत्येक जातीमध्ये जातीयवाद दिसून येतो. अगदी उच्च आणि कनिष्ठ समजल्या गेलेल्या जातीतील लोकही जातीवाद करताना दिसतात. जातीच्या चौकटीत राहिल्यामुळे आपल्याला चांगले जीवन जगता येईल, लोक आपणास त्रास देणार नाहीत, आपली बे-अब्रू होणार नाही, आपल्याला कुणी अवमानीत करणार नाही, नावे ठेवणार नाही, हा अशा विवाहांना विरोध करण्यापाठीमागचा विचार असतो. हा विचार संकुचित असला तरीही कित्येक शिकलेले लोकदेखील या संकुचित विचाराला सोडायला तयार नाहीत. जातीच्या टोकाच्या अभिमानातून हिंसक विचार निर्माण होतो.

पूर्वी 'सत्याग्रही विचारधारा' मासिकाचा प्रतिनिधी म्हणून काही घटनांवर मी रिपोर्ताज लिहिले आहेत. त्यात असे दिसून येते, की आपली समाजामध्ये पत खराब होईल, आपल्या मुला-मुलींनी आंतरजातीय विवाह केला म्हणून समाज तोंडात शेण घालेल, नातेवाईक आपल्याला नावं ठेवतील, समाजात आपल्याला तोंड दाखवायला देखील जागा उरणार नाही या विचारांनी ऑनर किलिंगच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. हे आपल्या समाजाचं दुर्दैव आहे. यातून आपण बाहेर पडू शकतो. यासाठी आपण आपल्या विचारांच्या कक्षा रूंद करायला हव्यात, जातीची चौकट मोडायला हवी, समानतेच्या मूल्याच्या आधारे वर्तन करायला हवे. आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहांना जर समाजामध्ये प्रोत्साहन मिळाले तर निश्चित एक समतामय समाज निर्माण होऊ शकेल आणि मोठ्या प्रमाणावर द्वेष कमी होईल.

सरकारने हे कृत्य थांबवायला हवे

माझ्या पाहण्यात असे कितीतरी मित्र–मैत्रिणी आहेत, ज्यांनी अंतरधर्मीय विवाह केल्यानंतर त्यांचे संसार अतिशय सुखाने सुरू आहेत. अर्जुमन आणि विशाल या आमच्या मित्रांचा आंतरजातीय विवाह झाला. त्यांचा संसार आज उत्तमरित्या चालू आहे. हिंदू आणि मुस्लीम या दोन्ही धर्मातील कुटुंबं त्यांच्या विवाहामुळे एकत्र आली आहेत. ते दिवाळी आणि ईद हे सण अगदी धुमधडाक्यात साजरे करतात. एक बहुसांस्कृतिक, बहुधर्मीय पद्धतीची संस्कृती त्यांच्या कुटुंबात पाहायला मिळते. अशा अनेक आंतरजातीय–आंतरधर्मीय विवाहातून भारताच्या एकात्म आणि बहुविध संस्कृतीचे दर्शन घडत असते. यात लव्ह जिहादचा अँगल देऊन राजकीय स्पेस शोधण्याचा कृपा करून सरकारने आणि कुठल्याही राजकीय पक्षाने प्रयत्न करू नये.

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांची नोंद ठेवणे, त्यांच्यावर लक्ष ठेवणे हे सरकारचे मुळीच काम नाही. यातून कोणत्या जातीतल्या व्यक्तीने कुठल्या जातीतल्या व्यक्तीसोबत विवाह केलेला आहे, हिंदू धर्मातल्या तरुणीसोबत कुठल्या मुस्लीम किंवा ख्रिश्चन तरूणाने विवाह केलेला आहे, हे सरकारला जाणून घ्यायचे आहे, असे यातून दिसते. आंतरजातीय–आंतरधर्मीय लग्न करून आम्ही सुखाने संसार करत आहोत. यात सरकारने हस्तक्षेप करू नये. सरकारने एक प्रश्न स्वतःला विचारावा, की आपल्याला समाजामधील जातीय आणि धार्मिक द्वेष कमी करायचा आहे, समतामय समाज निर्माण करायचा आहे की समाजाला घाबरवून त्यामध्ये अधिक तेढ निर्माण करायची आहे?

महाराष्ट्राचे महिला आणि बालकल्याण विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडे या नव्या समितीची जबाबदारी आहे. लोढा साहेबांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पार्श्वभूमी आहे. या नव्या समितीबाबतचा जीआर काढण्यापाठीमागचा उद्देश लोढा साहेबांनी बोलून दाखवला आहे. राज्य सरकारला जर लक्षच ठेवायचे असेल तर बाकीच्या अनेक समस्या आहेत, ज्यांच्याकडे त्यांनी लक्ष द्यायला हवे. सरकारने पाळत ठेवण्यापेक्षा अशा विवाहांना कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून अधिक प्रोत्साहन द्यायला हवे, दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनपर अनुदानात वाढ करायला हवी. तरुण–तरुणींना आधार कसा द्यायचा यासंबंधी पोलिसांना प्रशिक्षण द्यायला हवे, आंतरजातीय–आंतरधर्मीय विवाह केलेल्या मुलींना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन स्वत:च्या पायावर उभे करायला हवे. अशा अनेक गोष्टी सरकारला करता येतील. नोंदणीच म्हणताय, तर विशेष विवाह नोंदणी कायद्यानुसार आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह होतो त्यावेळी सरकारकडे तशा पद्धतीची नोंदणी होतच असते. शिवाय इतर मार्गांनी विवाह केलेल्या तरूण–तरूणींची नोंद स्थानिक स्वराज्य संस्थांतूनही होत असते. त्यामुळे वेगळी नोंदणी करणे, त्यांच्यावरती वेगळे लक्ष देणे याची कुठलीही आवश्यकता नाही. महत्त्वाचे म्हणजे राज्यभरातून तज्ज्ञांची समिती नेमण्यापेक्षा सरकारने पोलीस, समाज कल्याण विभागातील आपल्या मनुष्यबळास अधिक प्रशिक्षित करावे. त्याची नितांत गरज आहे. मिश्र विवाहासाठी पुढाकार घेणाऱ्या सामाजिक संघटनांना प्रोत्साहन देता येईल. तसेच शाळा, महाविद्यालये या ठिकाणी समतेचे धडे कशा पद्धतीने गिरवले जातील, यावर लक्ष केंद्रित करावे. हा सरकारच्या कर्तव्याचा भाग आहे. मात्र, सरकारची पावले या दिशेने पडताना दिसत नाहीत.

हिंदुत्ववादी संघटना या देशांमध्ये अल्पसंख्याकांना टार्गेट करत आहेत. त्यांच्याशी संबंधित राजकीय पक्ष आपली पोळी भाजत आहेत. गुजरात आणि उत्तर प्रदेशमध्ये धार्मिक द्वेषाचे वातावरण निर्माण केले आणि त्यातून राजकीय विजय प्राप्त केला, तसा राजकीय विजय इतर राज्यांमध्ये त्यांना मिळवायचा आहे. हिंदू धर्मावरती अन्याय होतो आहे, हिंदू धर्मातल्या लोकांना ख्रिश्चन आणि मुस्लीम धर्मीय लोक हे आमिष दाखवून धर्मांतरित करत आहेत, हिंदुच्या मुलींशी लग्न करून त्यांचे धर्मांतर घडवून आणले जात आहे, अशी आवई उठवली जात आहे. मात्र, वस्तुस्थिती तशी अजिबात नाही. लोकांना जितके म्हणून जात आणि धर्माच्या चौकटीत अडकवून ठेवता येईल तितके ते अडकवून ठेवत आहेत. सरकारचा अल्पसंख्याक समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अतिशय संकुचित आहे. नागरिकत्व दुरूस्ती अधिनियम म्हणजे सीएए कायद्याच्या वेळी आपण हे पाहिले आहे. यातून त्यांचा दृष्टीकोन आणि अजेंडा स्पष्ट होतो. आम्हा युवक–युवतींना कुठल्याही स्वरूपाचा जातीय आणि धार्मिक द्वेष नको आहे. आम्हाला एक समतामय समाज हवा आहे. ज्या समाजामध्ये आम्ही सर्व माणूस म्हणून उजळ माथ्याने वावरू शकू. या अपेक्षेचे भान सरकारने वेळोवेळी ठेवायला हवे.

(लेखक 'सत्याग्रही विचारधारा' मासिकाचे माजी सहसंपादक आहेत.)

– सतीश देशपांडे

ई–मेल : sdeshpande02@gmail.com

ISO 9001-2015 प्रमाणित

सहकाररत्न, संस्थापक माजीमंत्री स्व. शंकररावजी कोल्हे साहेब यांच्या अहर्निष प्रयत्नांतून साकारलेला

सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना लि., सहजानंदनगर

पो.शिंगणापूर, ता.कोपरगाव, जि.अ.नगर.
मोबाईल नं. ८४११००२७४१ ते ४४
फॅक्स : (०२४२३)२२४१३० E-mail: contactus@sanjivanigroup.org.in

सूत्रधार संचालक



मा. बिपीनदादा कोल्हे

सहकार रत्न



स्व. शंकररावजी कोल्हे

आमची दर्जेदार उत्पादने : ● पांढरी शुभ्र साखर, अल्कोहोल व त्यावर आधारित केमिकल उत्पादने. ● १२ मे.वॅट सहवीजनिर्मिती प्रकल्प कार्यान्वित व देशात सर्वप्रथम ज्युस टू इथेनॉल प्रकल्प, तसेच संजीवनी हँड सॅनिटायझर उत्पादन. ● पॅरासिटीमॉल औषधी प्रकल्प उभारणी सुरु ● जलसंवर्धन मोहिमेअंतर्गत गोदावरी नदीवर कोल्हापूर पद्धतीचे बंधारे तसेच कार्यक्षेत्रात मातीचे दगडी साठवण बंधारे बांधून त्याद्वारे कृषी उत्पादन वाढीसाठी प्रयत्न.विविध समाजोपयोगी उपक्रमांची यशस्वी उभारणी.

ग्रामीण भागातील जनतेच्या व सभासद शेतकऱ्यांच्या विकासासाठी संजीवनी उद्योग समूहाच्या माध्यमांतून विविध समाजोपयोगी उपक्रमांची यशस्वी उभारणी.

सौ. स्नेहलताताई कोल्हे (मा. आमदार)

मा. विवेकभैय्या कोल्हे (चेअरमन)

● उच्चतम साखर उतारा व उत्कृष्ट व्यवस्थापनामुळे कारखान्यास देश व राज्य पातळीवर आजवर विविध २० पारितोषिकांनी संजीवनी उद्योग समूहाचा सन्मान. ● शेतकऱ्यांच्या शेती उद्योगास जोडधंद्यासाठी दुग्ध, कुक्कुट व्यवसायासाठी संघाची स्थापना व मार्गदर्शन. ● तालुक्यातील दुष्काळी भागातील जनावरांना मोफत चारा वाटप तसेच वाड्यावस्त्यांना, कोपरगाव शहरवासीयांना टँकरमार्फत विनामूल्य पिण्याच्या पाण्याचा पुरवठा. दुष्काळी भागात प्लॅस्टिक टाक्यांचे विनामूल्य वाटप. ● संजीवनी उद्योग समूहाच्या माध्यमातून सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने कोपरगाव तालुक्यात वृक्षारोपण, संगोपन तसेच पर्यावरण संतुलनासाठी दरवर्षी वृक्षारोपण कार्यक्रम. ● बालवाडीपासून ते उच्च तांत्रिक, अभियांत्रिकी, महाविद्यालयीन, व्यावसायिक व्यवस्थापन, अध्यापन, फार्मसी, पदविका आदी शैक्षणिक सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देवून देशपातळीवरील ग्रामीण भागातील पहिले बीपीओ कॉल सेंटर सुरु. ● शेतकरी, कष्टकरी, महिला बचतगट शेतमजूरांना उद्योग, लघु उद्योग व्यवसायासाठी सुलभ कर्जपुरवठा व मार्गदर्शन. ● शेतकऱ्यांसाठी विशेष मोहीम राबवून सन २०११–१२ ते २०१८–१९ या काळात सुमारे ५१ कोटी ८० लाख ३३ हजार ३०० रुपयांचा पीक विमा, नुकसानभरपाई शासनाकडून मिळवून देण्याकामी सहकार्य. ● गरजू गोरगरीब शेतकरी सभासद, महिला वर्गासाठी मोफत सर्वरोग निदान तसेच डोळे तपासणी, उपचार, मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचा लाभ. ● कोपरगाव येथे सन २०१८ मध्ये सर्वप्रथम सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन. (२६ जोडपी विवाहबद्ध तर २०१९ मध्ये ४४ जोडपी, २०२२ मध्ये १७ जोडपी विवाहबद्ध.) त्यांना संसारोपयोगी साहित्यांचे वाटप व नाम फाउंडेशनला जलसंधारण कामासाठी भरीव आर्थिक मदत. ● कोरोना आपत्तीकाळात सभासद शेतकऱ्यांना तसेच कोपरगाव मतदार संघातील रहिवाशांना हँड सॅनिटायझर व सुरक्षा मास्कचे वितरण, जंतुनाशक फवारणी, आरोग्य सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षा सुट तसेच ग्रामीण आरोग्य केंद्र–उपकेंद्र, काकडी विमानतळ तसेच सामाजिक घटकांसह कोविड योद्धयांना सोडीयम हायपोक्लोराईड, हँड सॅनिटायझर, डिजिटल थर्मामीटर, सुरक्षा मास्कचे तसेच कोविड सेंटर रुग्णांना मोफत जेवण वितरण, ऊसतोडणी मजुरांची मोफत कोरोना तपासणी व औषधांचे वाटप. ● कोरोना महामारी साथरोग काळात आत्मा मालिक संकुल येथे संजीवनी कोविड केअर सेंटर व संजीवनी डेडीकेटेड सेंटरच्या माध्यमांतून ५०० खाटांसह ४० ऑक्सीजन खाट स्वतंत्ररीत्या सुविधेसह व त्यामार्फत कोरोनाग्रस्तांवर मोफत उपचारासह आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या. ● आत्मनिर्भर योजनेतून महिला बचत गटामार्फत लॉकडाउन काळात सुरक्षा मास्क निर्मितीतून महिलांना आर्थिक पाठबळ.

बाजीराव जी. सुतार	रमेश घोडेराव	विवेकभैय्या कोल्हे	बिपीनदादा कोल्हे
कार्यकारी संचालक (M.A.G.D.C.&A.M.B.A.)	व्हाईस चेअरमन	चेअरमन (B.E.civil)	सूत्रधार संचालक B.Sc. (Agri.)

व सर्व सन्माननीय संचालक मंडळ

संलग्न संस्था : १) साई संजीवनी को. ऑप बँक २) संजीवनी सहकारी पतसंस्था ३) संजीवनी एज्युकेशन सोसायटी ४) सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कामगारांची पतपेढी ५) संजीवनी सैनिकी स्कूल ६) संजीवनी इंग्लिश मिडियम स्कूल ७) संजीवनी शैक्षणिक ग्रामीण विकास विश्वस्त संस्था ८) अमृत संजीवनी,सुवर्ण संजीवनी शुगरकेन ट्रान्सपोर्ट कं. लि. ९) सहकाररत्नशंकरराव कोल्हे शेतकरी सहकारी संघ १०) संजीवनी मदत केंद्र ११) संजीवनी तालीम संघ १२) संजीवनी ॲडव्हेंचर स्पोर्टस क्लब १३) महाराष्ट्र राज्य शुटींग बॉल असोसिएशन १४) संजीवनी ॲकॅडमी १५) संजीवनी कॉलेज १६) संजीवनी फाऊंडेशन १७) संजीवनी बीपीओ कॉल सेंटर १८) संजीवनी युवा प्रतिष्ठान १९) संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट. २०) सहकारमहर्षी शंकररावजी कोल्हे विचारधारा ट्रस्ट, कोपरगाव

श्री. ज्ञानेश्वर परजणे, श्री. विश्वासराव महाले, श्री. बापूसाहेब बारहाते, श्री. निलेश देवकर, श्री. बाळासाहेब वक्ते, श्री, रमेश आभाळे, श्री. ज्ञानदेव औताडे, श्री. आप्पासाहेब दवंगे, श्री. राजेंद्र कोळपे, श्री. ज्ञानेश्वर होन, श्री. मनेष गाडे, श्री. विलासराव वाबळे, श्री. विलासराव माळी, श्री. त्र्यंबकराव सरोदे, सौ. उषा संजय औताडे, सौ. सोनिया बाळासाहेब पानगव्हाणे, श्री. निवृत्ती बनकर, श्री. सतीश आव्हाड
मा. प्रादेशिक सह. संचालक साखर (अहमदनगर) शिवाजीराव दिवटे जनरल मॅनेजर (शुगर), प्रकाश डुंबरे (ॲडमिनीस्ट्रेटीव्ह मॅनेजर) टी. आर. कानवडे (सेक्रेटरी) तसेच • सर्व सभासद, शेतकरी बांधव, पदाधिकारी, खाते प्रमुख, उपखातेप्रमुख, हितचिंतक

विश्वास, जिव्हाळा आणि आनंदाचा सुगंध सर्वांना देणारा संजीवनी उद्योग समूह

वर्धापन विशेष

हा खटाटोप कशासाठी?

मुमताज शेख

> देशात लव्ह जिहाद नावाचे प्रकरण गेली सात-आठ वर्षात प्रकर्षाने सतत चर्चेत राहिले आहे. किंबहुना ते हेतुत: चर्चेत ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर १३ डिसेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र राज्याच्या शिंदे-फडणवीस सरकारने आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहांबाबत, महिला आणि बालविकास विभागांतर्गत राज्यस्तरीय 'आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह-कुटुंब समन्वय समिती' नावाने समिती स्थापन केली. या निर्णयास मोठा विरोध झाल्यानंतर सरकारने त्यातील 'आंतरजातीय' शब्द काढून केवळ 'आंतरधर्मीय' विवाहाशी संबधित हा निर्णय आहे, अशी दुरूस्ती केली. अशा विवाहांमधील जोडपी आणि त्यातील विवाहित महिलांच्या कुटुंबांची तपशीलवार माहिती गोळा करण्यासाठी ही समिती कार्यरत असेल, असे जाहीर करण्यात आले आहे. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांना सहाय्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सरकार म्हणते. पण खरेच असे आहे का? कोणी-कोणासोबत लग्न केले? ते कोणत्या धर्माचे, कोणत्या जातीचे आहेत? अशा प्रश्नांची माहिती सरकारला का हवी आहे? का माहिती घेऊन झाल्यानंतर पुढच्या गोष्टी करायला सोपं जावं म्हणून हा समितीचा खटाटोप आहे, याच्या तपशिलात जायला हवे.

आपल्या देशात (मी मुस्लीम आहे आणि हा देश माझा आहे म्हणून आपल्या देशात), आपणच निवडून दिलेले आपले प्रतिनिधी संविधानिक मूल्ये पायदळी तुडवून सरकारी यंत्रणाच्या माध्यमातून आपल्या हजारो वर्षांच्या धार्मिक, सामाजिक सलोख्याची वीण कशी उसवू शकतात याची असंख्य उदाहरणे, घटना, प्रसंग २०१४ पासून तथाकथित विकासपुरुष सर्वोच्च सत्तास्थानी असल्यापासून आपण पाहतोय. तथाकथित विकासपुरूष ज्या राजकीय पक्षातून येतात, त्या पक्षाची सरकारे असलेल्या अनेक राज्यात 'राजा बोले, प्रजा चाले' असेच चित्र थोड्या फार फरकाने दिसतेय. हिंदू राष्ट्राचे narrative व्यवस्थित रूजविण्यासाठी सदर पक्ष आणि त्यांची मातृसंस्था असलेली राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संस्था गेली ८ वर्षे सर्व सरकारी यंत्रणा, योजना, सर्व निवडणुका याचा पध्दतशीर उपयोग करुन घेताना दिसत आहे.

या प्रार्श्वभूमीवर 'लव्ह जिहाद' नावाचे प्रकरण गेली सात-आठ वर्षात प्रकर्षाने सतत चर्चेत राहिले आहे. किंबहुना ते हेतुत: चर्चेत ठेवले आहे. १३ डिसेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र राज्याच्या शिंदे-फडणवीस सरकारने आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांबाबत, महिला आणि बालविकास विभागांतर्गत राज्यस्तरीय 'आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह-कुटुंब समन्वय समिती' नावाने एक समिती स्थापन केली आहे. अशा विवाहांमधील जोडपी आणि त्यातील विवाहित महिलांच्या कुटुंबांची तपशीलवार माहिती गोळा करण्यासाठी ही समिती कार्यरत असेल, असे या शासन निर्णयात जाहीर करण्यात आले आहे. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांना सहाय्य करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सरकार म्हणते. पण खरेच असे आहे का? कोणी-कोणासोबत लग्न केले ? ते कोणत्या धर्माचे आहेत? कोणत्या जातीचे आहेत? अशा प्रश्नांची माहिती सरकारला का हवी आहे ? का माहिती घेऊन झाल्यानंतर पुढच्या गोष्टी करायला सोपं जावं म्हणून हा समिती करण्याचा खटाटोप आहे, याच्या तपशिलात जाणे गरजेचे ठरते.

वर म्हटल्याप्रमाणे लव्ह जिहादच्या निमित्ताने जी काही चर्चा सुरू आहे आणि नुकतेच घडलेल्या श्रद्धा वालकर हत्या प्रकरणात मुख्य आरोपी असलेला आफताब, हेही सरकारच्या या निर्णयाचे तात्कालिक कारण आहे असे वाटते. कारण महाराष्ट्रातले हे सरकार आणि केंद्रातले मोदी सरकार अशी ही दोन्ही (डबल इंजिन) सरकारे एक विशिष्ट विचारधारा सातत्याने पुढे रेटत आहेत. ती विचारधारा म्हणजे मुस्लीम विरोध! त्यादृष्टीने विचार करायचा तर महाराष्ट्र सरकारचा हा निर्णय म्हणजे, लव्ह जिहादच्या नावाने राज्यात धार्मिक तणावाचे व उन्मादाचे वातावरण तयार करून आंतरधर्मीय विवाहितांच्या सुरक्षित जगण्याच्या हक्कावर निर्बंध घालण्याचा आहे. या निर्णयास मोठा विरोध झाल्यानंतर शिंदे-फडणवीस सरकारने त्यातील 'आंतरजातीय' हा शब्द काढून केवळ 'आंतरधर्मीय' विवाहाशी संबधित हा निर्णय आहे, अशी दुरूस्ती केली. म्हणजेच त्यांचा हेतू स्पष्ट आहे, की त्यांना कुणाला टार्गेट करायचे आहे.

लव्ह जिहादच्या अनुषंगाने, उत्तर प्रदेश, हरियाणा, कर्नाटक, मध्यप्रदेश या राज्यांमध्ये कायदे अस्तित्त्वात आहेत. या कायद्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत –

- मुलीचा धर्म बदलण्याच्या उद्देशाने केलेला विवाह रद्द केला जाईल, १० वर्षांपर्यंत तुरूंगवासाची शिक्षा होऊ शकते.
- जबरदस्तीने धर्मांतर केल्यास १ ते ५ वर्षांच्या तुरूंगवासासह १५,००० रुपये दंडाची शिक्षा होऊ शकते.
- संबंधित महिला अल्पवयीन असल्यास किंवा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीची असल्यास ३ वर्षे ते १० वर्षांपर्यंत तुरूंगवासाची शिक्षा आणि २५,००० रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.
- सामूहिक धर्मांतर करणाऱ्या संस्थांना ३-१० वर्षांचा तुरूंगवास आणि ५०,००० रुपयांचा दंड ठोठावला जाईल.
- जर कोणाला लग्नानंतर धर्म बदलायचा असेल तर त्याला दोन महिने अगोदर जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावा लागेल.

केंद्रीय तपास यंत्रणांना केरळमधील काही प्रकरणात काही सक्तीचे धर्मांतर आढळले नाही, केंद्रीय राज्य गृहमंत्री संसदेत लेखी उत्तरात लव्ह जिहाद असे काही कोणत्याही कायद्यात स्पष्टपणे define ***नाही असे म्हटले असताना, महाराष्ट्र सरकारची ही समिती बळजबरीने धर्मांतर होऊन लग्न झाले आहे हे कसे काय शोधून काढणार? हा मोठा संशोधनाचा विषय आहे. शिवाय ही समिती सर्व औपचारिक आणि अनौपचारिक विवाह केंद्रांमधून ही माहिती घेणार आहे.***

भारतात १९६७ पासून धर्मांतरविरोधी कायदे असले तरी उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेश ही पहिली राज्ये होती, की ज्यांनी विवाहासंबंधी कायदा लागू केला. उत्तराखंडचा धर्म स्वातंत्र्य कायदा-२०१८, चुकीचे चित्रण, बळजबरी, फसवणूक, अवाजवी प्रभाव, प्रलोभन किंवा विवाह याद्वारे धर्मांतर करण्यास मनाई करतो. त्यासाठीची शिक्षा एक ते पाच वर्षे तुरूंगवास आणि दंड अशी आहे. त्यामुळे तो अजामिनपात्र गुन्हा ठरतो. हिमाचल प्रदेशने २०१९ मध्येही असाच कायदा केला होता.

वरील सर्व माहिती तपशिलात देण्याचे कारण एवढेच, की धर्मांतर (आपल्याकडे संविधानाने दिलेल्या अधिकारानुसार कोणीही व्यक्ती स्वत:च्या इच्छेने धर्म बदलू शकते, वा नाकारू शकते) हा मुद्दा नसून एका विशिष्ट धर्म समुदायास या देशात कोपऱ्यात रेटण्याचा आहे. जेणेकरून तो धर्म त्याची कोंडी झाल्यामुळे मुख्य प्रवाहातून बाहेर फेकला जाईल. आधीच आपल्या देशात मुस्लीम समाजाबद्दल जे ढोबळ समज आणि विचार आहेत, त्यानुसार मुस्लीम समाजातील मुले, हिंदू समाजातील मुलींना प्रेमाचे/लग्नाचे आमिष दाखवून धर्मांतर करायला लावतात. त्यांना अनेक मुलांना जन्म घालायला लावतात आणि पर्यायाने या देशात मुस्लीम लोकसंख्या वाढवून त्यांना हा देश आपल्या ताब्यात घ्यायचा आहे, असे हास्यास्पद कारण देऊन लव्ह जिहाद सारखे कायदे आणले आहेत. गुजरात आणि केरळ सारख्या राज्यात सुद्धा असे कायदे आणण्याचे विचार सुरु आहेत. मला असे ठामपणे वाटते, की महाराष्ट्र सरकारची वर उल्लेख केलेली राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यामागे अशा प्रकारच्या कायद्याला शासकीय माहितीचा आधार देण्यासाठीचा उद्देश असावा, हे नाकारता येणार नाही.

खरी मेख इथेच आहे. कारण दोन परधर्मीय/परजातीय सज्ञान व्यक्ती एकमेकांच्या संमतीने, प्रेमाने विवाह करू इच्छितात. त्यात सरकारने त्याची माहिती घेण्याची काहीही गरज नाही. फार तर विवाह नोंदणी होणे आवश्यक आहे असे सरकारने म्हणावे. कारण विवाहातून येणाऱ्या जबाबदाऱ्या आणि नंतरच्या कायदेशीर बाबी पूर्ण करण्यासाठी (विशेषतः

महिलांसाठी) विवाह नोंदणी फारच आवश्यक आहे. आपल्याकडे त्यासाठी महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८ हा कायदा आहे. त्यासाठी सरकारने व्यापक जनजागृती करावी. पण येथे सरकारचे मनसुबे फार वेगळे आहेत. सरकारला अशा विवाहसंबंधामध्ये विवाहाआधी किंवा नंतर धर्मांतर झाले आहे की नाही? पळून जाऊन लग्न केले असेल तर मुली/महिला त्यांच्या कुटुंबियाच्या संपर्कात आहेत की नाही? आई-वडील अशा प्रकारच्या विवाहास अनुकूल नसले तर त्याचे समुपदेशन करणे (वाचा : महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. विवाह-२०२२/प्र.क्र.२१८/का-०२ दि. १३.१२२०२२ व दि. १४.१२. २०२२) असे काही करायचे आहे.

याबाबत आपण केरळमधील २०१७ मधील प्रसिद्ध हदिया (आधीचे नाव अखिला अशोकन) प्रकरणाचा अभ्यास करायला हवा. हदियाचे लग्न शफीन नावाच्या मुस्लीम युवकाशी २०१६ मध्ये झाले. हदियाच्या वडिलांनी केरळ उच्च न्यायालयात हदियाचे सक्तीचे धर्मांतर करून लग्न करण्यात आले आहे, या आधारावर रिपिटीशन दाखल केला. केरळ उच्च न्यायालयाने अशोकन यांचा हा रिपिटीशन मान्य करून हदिया आणि शफीनचे लग्न अवैध ठरवून हदियाला तिच्या आई-वडिलांकडे सपुर्द करण्याचे आदेश दिले. पुढे सुप्रीम कोर्टाने हदियाची बाजू ऐकून केरळ उच्च न्यायालयाचा आदेश रद्दबातल ठरविला. हदियाचे धर्मांतर हे तिच्या इच्छेने झाले आहे आणि तिला तिच्या पतीसोबत रहाण्याचे तिचे म्हणणे मान्य केले. तसेच केरळ मधील लव्ह जिहादच्या अन्य ११ प्रकरणात तपास करताना राष्ट्रीय तपास संस्था अर्थात National Investigation -gency (NI-) ला सक्तीने धर्मांतर केल्याचे कोणतेही पुरावे आढळले नाहीत. तसेच २०२० च्या संसदेच्या अधिवेशनाच्या कामकाजात, केंद्रीय राज्य गृहमंत्री श्री. जी. किशन रेड्डी हे आपल्या लेखी उत्तरात असे म्हणतात, की Love Jihad is not defined under the law, and no such case has been reported by any of the central agencies". पुढे ते असे म्हणतात, "Article 25 of the Indian Constitution provides for the freedom to profess, practice and propagate religion subject to public order, morality and health".

आता जर केंद्रीय तपास यंत्रणांना केरळ मधील काही प्रकरणात काही सक्तीचे धर्मांतर आढळले नाही, केंद्रीय राज्य गृहमंत्री संसदेत लेखी उत्तरात लव्ह जिहाद असे काही कोणत्याही कायद्यात स्पष्टपणे define नाही असे म्हटले असताना, महाराष्ट्र सरकारची ही समिती बळजबरीने धर्मांतर होऊन लग्न झाले आहे हे कसे काय शोधून काढणार? हा मोठा संशोधनाचा विषय आहे. शिवाय ही समिती सर्व औपचारिक आणि अनौपचारिक विवाह केंद्रांमधून ही माहिती घेणार आहे. पण गंभीर मुद्दा असा आहे, की बहुतेक पळून जाऊन लग्न करणारे जोडपे (शब्द पहा कसे वापरले आहेत जीआर मध्ये) हे काही अशा विवाह मंडळात जाऊन लग्न करत नाहीत, ते त्या त्या (ज्या कोण्या धर्माचे ते आचरण करत असतील) धर्माप्रमाणे मंदिरात, मशिदीत, चर्च किवा विहारात जाऊन लग्न लावून घेतात. शिवाय दोन सज्ञान व्यक्तींनी एकत्र राहण्याचा (लग्न करून किंवा न करता) तर त्यांचे आई-वडील, कुटुंबिय यांनी अनुकूल असण्याचे कोणतेही प्रमाणपत्र कोणताही कायदा मागत नाही. मग आपल्या पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात, आजच्या या सरकारला नसती उठाठेव करण्याची गरज आणि कारण काय? हा प्रश्न आपण विचारला पाहिजे. त्याच बरोबर महिलांबाबत एवढी आस्था असेलच तर रोज महिलांवर वेगवेगळ्या प्रकारे होणारी हिंसा, मग ती छेडछाड, बलात्कार,कौटुंबिक हिंसाचार कायद्यामध्ये असणाऱ्या त्रुटी, ज्यामुळे महिलांना न्याय मिळत नाही, वर्षोनुवर्षे प्रलंबित असलेली पोटगीची प्रकरणे, मुलांचा ताबा, अशा असंख्य प्रश्नांवर महिला बाल विकासने संवेदनशील होऊन काम करायला हवे. ते सोडून भलतेच काम करण्याचे त्यांनी ठरविले आहे.

सदर शासननिर्णय म्हणजे संविधानास अपेक्षित असलेल्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवण्याचा प्रकार आहे. बरे,

पळून जाऊन लग्न करून धर्मांतर होते असे जर सरकारचे म्हणणे असेल, तर त्यासाठी संबधित कुटुंबिय, पोलीस, न्यायालये आहेत आणि वर म्हटल्याप्रमाणे आपल्या देशात १९६७ पासून धर्मांतर बंदीसाठी कायदा आहे. मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यातील १६ व्या कलमानुसार कायद्याने प्रौढ वयात प्रवेश केलेल्या स्त्री-पुरूषांना परस्परांशी विवाह करण्याचा अधिकार आहे आणि वंश, राष्ट्रीयत्व किंवा धर्म यांच्या आधारावर हा अधिकार काढून घेता येणार नाही. तरीही नागरी आणि राजकीय कारणांनी अनेक देशात धर्म आणि वंश या मुद्यांवर विवाह करण्यास बंधने घालण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील जातीव्यवस्था संपविण्यासाठी आंतरजातीय विवाह व्हायला हवेत असे म्हटले आहे. महाराष्ट्र सरकारच्या समाज कल्याण विभागाच्या योजनेतून आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यास प्रोत्साहन म्हणून मदतही केली जाते. मग आंतरधर्मीय विवाहांना प्रोत्साहन का नको? निकोप समाज आणि समृद्ध सहजीवनासाठी प्रेम, आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह होणे ही अत्यंत आवश्यक बाब आहे. तसे झाले तरच एका धर्माबद्दल, जातीबद्दल टोकाचा द्वेष कमी होईल. जाती-जातींमधील, धर्मा-धर्मातील तेढ कमी होईल आणि संविधानास अपेक्षित असणारी बंधुता प्रत्यक्षात येण्यास मदत होईल. बाकी सरकारने त्याचे काम करावे....मियाँ बीबी राजी तो क्या करेगा काजी!

(लेखिका कोरो इंडिया सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्या आहेत.)

- मुमताज शेख

ई. मेल : mumtajcorommf@gmail.com

सत्याग्रही विचारधारा
वर्गणीसाठी फॉर्म

महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे **सत्याग्रही** विचारधारा

वार्षिक वर्गणी

रुपये **350/-**

नाव : ____________________

पत्ता : ____________________

भ्रमणध्वनी/दूरध्वनी : ____________________

ई-मेल : ____________________

आपली सभासद नोंदणी ऑनलाईन/मनिआर्डर/ बँकेत खाते जमा करता येईल. वर्गणी जमा केल्यावर ७२१९१९८१९९ या क्रमांकावर आपल्या नाव व पत्त्याचा तपशील कळवावा.

ऑनलाईन वर्गणीसाठी
खात्याचे नाव - सत्याग्रही विचारधारा
बँकेचे नाव - बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वेनगर शाखा, पुणे
सेव्हिंग खाते क्रमांक- 20057098513
IFSC कोड - MAHB0000970
अधिक माहितीसाठी संपर्क :
7219198199/ 7447622878

२ वर्षांची वर्गणी : रु. ७००/-
३ वर्षांची वर्गणी : रु. १०५०/-
४ वर्षांची वर्गणी : रु. १४००/-
५ वर्षांची वर्गणी : रु. १७५०/-
आजीव सभासद : रु. ११हजार



वर्धापन विशेष

स्वप्नांच्याही पलिकडे...

(एक केस स्टडी)

पल्लवी धामणे-रेखी

लग्न म्हटलं की, दोन व्यक्ती, दोन कुटुंबं, दोन विविध विचारांची माणसं एकत्र येणं हे सगळ्यांनाच मान्य आहे. पण जेव्हा दोन समाज आणि त्याही पलीकडे जाऊन दोन धर्मांतील दोन व्यक्ती एकत्र येतात तेव्हा त्यांचा संघर्ष, त्यांचं एकत्र येण हे वेगळेपण सिद्ध करण्याबरोबरच एक उदाहरण बनून जातं. सध्या 'लव्ह जिहाद'च्या नावाखाली कोणी एक बरोबर आणि कोणी एक चुकीचा अस ठरवलं जात असतांना अशी काही उदाहरणं आहेत, त्यांच्याकडे बघून आपल्यातील सकारात्मकता टिकून राहते. हेच बरोबर आणि ते चूक याला छेद देत, प्रवाहाविरुद्ध जाऊन, अनेक कठीण प्रसंगाचा सामना करत आज ते आनंदाने त्यांचं जीवन व्यतीत करत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या आंतरधर्मीय विवाहाबाबत समिती स्थापन करण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर असा विवाह केलेल्या डॉ. दिपाली आणि डॉ. हमीद (नाव बदलले आहे) यांची कहाणी जितकी वेगळी, तितकीच रोमांचकारी आणि ह्रदयाला हात घालणारी आहे. प्रश्नोत्तरातून रंगत गेलेली ही कहाणी 'सत्याग्रही'च्या वाचकांसाठी...

※ डॉ. दिपाली तुमचे बालपण कसे आणि कुठे गेले?

माझा जन्म तालुकास्तरीय शहरातील एका हिंदू मध्यमवर्गीय कुटुंबांत झाला. माझे आई आणि बाबा दोघे माध्यमिक शाळेतील शिक्षक. घरात एकत्र कुटूंब आणि शिस्तीचे वातावरण. आजी-आजोबा, काका-काकू, भावंडं, घरी येणारे पै-पाहुणे. नेहमीच घरात माणसांची ये-जा. त्यामुळे घरातील सणवार, छोटे-मोठे कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडायचे. मात्र घरात आई-बाबांमुळे शिस्तीचे आणि अभ्यासाचे वातावरण होते.

※ डॉ. हमीद तुमचे बालपण कुठे आणि कसे गेले?

माझा जन्म देखील त्याच शहराच्या दुसऱ्या टोकाला असणाऱ्या मुस्लीम मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. आई-वडील दोघेही प्राथमिक शाळेत शिक्षक. घरात एकत्र कुटूंब आणि भावंडं. आई-वडील शिक्षक असल्याने घरातील सगळ्या मुलांनी शिकावे आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे, यासाठी ते विशेष प्रयत्नशील होते. त्यामुळे आमच्या अभ्यासाकडे त्यांचे बारीक लक्ष होते. मी अभ्यासात हुशार होतो. १२ वी नंतर मला मेडिकलला जायचे होते. त्यादृष्टीने बराच अभ्यास करून, उत्तम गुण मिळवून मी लोणी येथील कॉलेजमध्ये एमबीबीएसला प्रवेश मिळविला. योगायोग म्हणजे दिपालीला देखील त्याच महाविद्यालयात एमबीबीएसला प्रवेश मिळाला. एकाच शहरातील असूनसुद्धा कधीही एकमेकांच्या समोर न आलेले आम्ही दोघे एमबीबीएसच्या पहिल्या वर्षाला एकत्र आलो. पण त्यानंतरही ३ वर्ष आमच्यात कुठल्याही प्रकाराचा संवाद नव्हता. अखेर हे शेवटचे वर्ष म्हणत वर्गातील काही कॉमन मित्रांचा एक ग्रुप बनला. त्यात आम्ही दोघे पहिल्यांदा बोलते झालो. हळूहळू मैत्री झाली. इर्टनशीपमध्ये आम्हा दोघांनाही कळले, की आमच्यात मैत्री पलीकडेही काही आहे. पण कसं शक्य आहे? म्हणत आम्ही ते मान्य करायचं टाळलं.

※ मग नक्की प्रपोज कोणी आणि कधी केले?

पुढील शिक्षणासाठी आम्ही वेगळे झालो. मला डीएनबीसाठी केरळला जावे लागले तर हमीदने डीसीएचसाठी नाशिकला

प्रवेश घेतला. मात्र आमच्या मनातील भावना आता दोघांनाही माहीत होती. दोघांचीही डिग्री पूर्ण झाली. त्यानंतर मी इंदौर येथे एका खासगी हॉस्पिटलमध्ये नोकरी सुरू केली. दरम्यान, हमीद हैद्राबाद येथील एका हॉस्पिटलमध्ये नोकरी बरोबरच पुढील शिक्षण देखील घेत होता. आता आम्ही दोघं स्वतःच्या पायावर उभे राहिलो होतो. दरम्यान, घरच्यांना कुणकूण लागली होती. तशी आम्ही दोघांनी घरी स्पष्ट बोलून कल्पनाही दिली. पण, दोघांची जातच नव्हे तर धर्मही वेगळे. त्यामुळे हे लग्न दोघांच्याही घरचे मान्य करणारच नव्हते. आता माझ्या घरी रीतसर कांद्या-पोह्यांचा कार्यक्रम सुरू झाला होता. तेव्हा पहिल्यांदा आमच्यातील प्रेमाची तीव्र जाणीव झाली. शिक्षण आणि नोकरी निमित्त सलग ३ वर्ष आम्ही वेगवेगळ्या शहरात राहून देखील आमच्यातील नाते आणि विश्वास टिकून होता.

⁕ पुढे काय झाले?

घरच्यांनी माझ्यासाठी योग्य स्थळ बघायला सुरूवात केल्यानंतर आता काहीही झाले तरी लग्न करायचेच हे हमीदने आणि मी पक्के ठरविले. त्यानुसार कोर्ट मॅरेज करू या, म्हणून वकिलांकडे चौकशी सुरू केली. त्यातील सुरूवातीच्या काही वकिलांनी 'केवळ अशक्य' असे म्हणत हात वर केले. अनेकांनी 'हे करू नका, हे कसे अयोग्य आहे', हेच वारंवार सांगितले. तर काहींनी तुमच्या जीवाला धोका आहे. कायद्यामध्ये तशी तरतूदच नसल्याचे सांगितले. त्यामुळे काही केल्या मार्ग निघत नव्हता. अखेर हैद्राबादला शरियत कायद्यानुसार दिपालीने स्वतःचे नाव व धर्म बदल केला. त्यानंतर आमचे कोर्ट मॅरेज झाले. त्यावेळी त्यासाठी माझ्यावर कोणताही दबाव नव्हता. लग्न करण्यासाठी त्यावेळी जे योग्य आणि आवश्यक वाटले ते आम्ही केले.

⁕ वैवाहिक जीवनाची सुरूवात कशी झाली?

हैद्राबादमध्ये आमचे दोघांचे सहजीवन तर सुरू झाले. मात्र, घरच्यांशी संबंध दुरावले. आता खरी परिक्षा होती. कोणत्याही आधाराशिवाय आणि आहे त्या पैशात स्वतःचे करिअर, घर उभे करायचे होते. एका भाड्याच्या खोलीत आमचा संसार सुरू झाला. हमीद एकाच वेळी दोन हॉस्पिटलमध्ये वेगवेगळ्या शिफ्टमध्ये काम करत होता. मी देखील सकाळी घरातील सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडत दुपारी हॉस्पिटल गाठत होते. अनेकदा रात्रपाळी करावी लागायची. हळूहळू पैसे जमा करत आम्ही भाड्याने जागा घेतली. तिथे स्वतःचे क्लिनीक सुरू केले. हळूहळू आमच्या संसाराची घडी बसत होती. दरम्यान, हमीदच्या घरच्यांनी आमचे लग्न मान्य केले आणि त्यांनी गावी येण्याचा आग्रह केला. त्याच वेळी मीही माझ्या घरच्यांशी संवाद साधू लागले. माझ्या आई-बाबांनीही त्यांचे लग्न मान्य केले. हमीदचा स्वभाव आणि त्याचे माझ्याबरोबरचे वागणे, कष्ट करण्याची तयारी बघून ते नरमले. मात्र, मुलीने आणि जावयाने आता पुन्हा गावी येऊ नये. येथे त्यांना अनेक कठीण प्रसंगांचा सामना करावा लागेल, असे त्यांना वाटायचे. आमचे हैद्राबादमध्येही क्लिनीक छान सुरू होते. त्यामुळे सगळे सोडून पुन्हा नव्याने सुरुवात करायची का? असे त्यांना वाटणे साहजिक होते. मात्र, आम्ही दोघे गावी परतलो.

⁕ गावी परत आल्यावर काही त्रास झाला का?

– नाही. खरे तर आम्ही दोघेही याच गावात लहानाचे मोठे झालो. त्यामुळे दोघांच्या घरची मंडळी येथेच राहत असल्याने आपल्या माणसांमध्ये परत येण्याची ओढ होती. हळूहळू सगळे छान होत होते. हीच बाब आमच्यासाठी खूप महत्त्वाची होती. तसेच, हमीदच्या आई-बाबांनी रीतसर रिसेप्शन देऊन, त्यांच्या सगळ्या नातलगांना बोलावून आमचे छान स्वागत केले. आता दिपाली शेख कुटुंबाचा हिस्सा बनली आहे.

⁕ गावी तुमचे स्वतःचे हॉस्पिटल उभे राहिले?

– हो. आम्ही हैद्राबादमधील सगळी जमापुंजी एकत्र करत गावी एक जागा भाड्याने घेतली आणि दवाखाना सुरू केला. पाच वर्षे आम्ही दोघे तो दवाखाना सांभाळत होतो. पण आता स्वत:ची जागा घेऊन हॉस्पिटल उभे केले आहे. सुरूवातीला दोन वर्षाचा काळ तसा कठीण होता. पण आता स्वत:साठीही वेळ मिळत नाही, इतका व्याप वाढला आहे.

⁕ तुमच्या लग्नामुळे घरातील भावडांची लग्नं करतांना काही विघ्नं आली का?

– अजिबात नाही. घरातील सगळेच सुशिक्षित आहेत. माझे सासू -सासरे प्राथमिक शाळेत शिक्षक होते. माझी सासू देखील शिक्षक असल्याने, घरातील मुलींवर कुठलाही दबाव नाही. दीर इंजिनिअर आहेत. दोन्ही नंणदा पैकी मोठी नणंद प्रोफेसर आहे. तर धाकटी डॉक्टर आहे. ती देखील स्वत:चे क्लिनीक सांभाळते.

* **तुमच्या लग्नाला आठ वर्षे झाली, कशी आहेत ही संसारातील वर्षे?**

– आम्ही खूश आहोत. इतक्या कमी वेळात स्वत:च्या हॉस्पिटलची जबाबदारी आम्ही पेलतो आहोत. आम्हाला ४ वर्षाचा मुलगा आहे. खरे तर स्वप्न सत्यात उतरते आहे, असे वाटते. आमच्या या वाटचालीत दोन्ही कुटुंबिय आमच्या समवेत आहेत. ही सगळ्यात जमेची बाजू आहे. त्यामुळे आजवर जो काही संघर्ष आम्ही केला तो फलद्रूप होतोय, असेच म्हणता येईल.

(लेखिका मुक्त पत्रकार आहेत.)

– पल्लवी धामणे–रेखी

ई–मेल : pallavidhamne@gmail.com

अशोक सहकारी साखर कारखाना लिमिटेड, अशोकनगर

तालुका–श्रीरामपूर, जिल्हा–अहमदनगर

ASSK

श्रम ही आमची प्रतिष्ठा । सहकार हेच आमचे वैभव ।। धरणे-बंधारे ही आमची मंदिरे । पाणी हेच आमचे दैवत ।।

व्हा.चेअरमन



मान.श्री.भाऊसाहेब उंडे

माजी आमदार मान. श्री. भानुदास मुरकुटे यांचे नेतृत्वाखाली उज्वल भविष्याकडे वाटचाल...

चेअरमन

मान.श्री.भानुदास मुरकुटे

चार्टर्ड अकौंटंट(माजी आमदार)

☐ जलसंवर्धनाचा पथदर्शक अशोक बंधारे प्रकल्प

☐ आसवनी व इथेनॉल प्रकल्प

☐ भास्करराव गलांडे पाटील औद्योगिक प्रशिक्षण केंद्र

☐ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अशोकनगर

☐ अशोक पॉलिटेक्निक महाविद्यालय,अशोकनगर

☐ अशोक इंग्लीश मिडियम व आयडियल स्कूल,प्रगतीनगर

१५ मेगावॅट क्षमतेचा सहवीज निर्मिती प्रकल्प सन २०१३-१४ च्या हंगामात

!! सत्याग्रही विचारधारा मासिकाच्या ३१ व्या वर्षारंभ विशेषांक निमित्त आमच्या हार्दिक शुभेच्छा!!

☐ संचालक मंडळ ☐

कोंडीराम उंडे	रावसाहेब थोरात	सोपानराव राऊत	पुंजाहरी शिंदे
आदिनाथ झुराळे	हिम्मतराव धुमाळ	बाबासाहेब आदिक	ज्ञानदेव पटारे
ज्ञानेश्वर शिंदे	विरेश गलांडे	रामभाऊ कसार	यशवंत बनकर
ज्ञानेश्वर काळे	यशवंत रणनवरे	अमोल कोकणे	प्रफुल्ल दांगट
योगेश विटनोर	शितल गवारे	हिराबाई साळुंके	मंजुश्री मुरकुटे

अच्युतराव बडाख संतोष देवकर (कार्यलक्षी संचालक) सिताराम खरात (कार्यलक्षी संचालक) अशोक पारखे (कार्यलक्षी संचालक)

मान.प्रादेशिक सह सचालक (साखर),अ.नगर तसच सभासद, अधिकारी व कर्मचारी परिवार

दूरध्वनी : (०२४२२) २४६४९१, २४६४९२ फॅक्स् : (०२४२२)२४६४९३

E-mail: ashokssk_anr@yahoo.co.in


The First Union of Port and Dock Workers in the Country to
complete more than Hundred Years of its Glorious Existence.
Mumbai Port Trust
Dock And General Employees' Union
(Estd. 3 May 1920)
Affilated to HMS / ITF
MBPT. DOCK & GENERAL EMPLOYEES' UNION
1920
'कर भला सो हो भला'
''सर्वात जास्त आनंद
कोणत्या गोष्टीत असेल तर
तो दुसऱ्यांना आनंद देण्यात ''
- कवी वर्डस्वर्थ
Adv. S. K. Shetye
President
Dr. Yatin Patel
Working President
Sudhakar Apraj
General Secretary
Port Trust Kamgar Sadan
Nawab Tank Road, Mazgaon, Mumbai - 400 010
Tel. : 23776320 / 6656 6487
E-mail : mbptdgeu@gmail.com

वर्धापन विशेष

गरज आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांची..

शिल्पा शिवणकर कांबळे

"गेल्या काही दशकात सुरू झालेल्या आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांच्या प्रक्रियेला आपण जाणीवपूर्वक गती देऊ शकलो तर जातीपातीत विभागला गेलेला आणि त्यामुळे खरी प्रगती करण्यात अडथळे येत असलेला भारतातला समाज एक होईल. परिणामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समानतेचे तत्त्व पाळणाऱ्या देशाचे स्वप्न सत्यात येईल. परंतु हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी समाजातल्या प्रत्येक घटकाने एकत्र येऊन प्रयत्न करून अशा प्रकारचे लग्न करणाऱ्या जोडप्यांना, त्यांच्या कुटुंबियांना आधाराचा हात देऊन पाठिंबा देणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र राज्याच्या महिला बाल विकास विभागाने १३ डिसेंबर रोजी एका परिपत्रकाद्वारे राज्य पातळीवर आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह-परिवार समन्वय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. याबाबत टीकेची झोड उठल्यानंतर सरकारने 'आंतरजातीय विवाह' या समितीच्या कार्यकक्षेतून वगळून आपला खरा धर्मांध अजेंडा स्पष्ट केला आहे.

आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह

Inter Caste marriage is the most practical way to blur the caste lines and render them irrelevant

Caste is a notion; it is a state of the mind. The destruction of caste does not therefore mean the destruction of a physical barrier. It means a notional change.

The real remedy for breaking Caste is in ter caste-marriage. Nothing else will serve as the solvent of caste.

- Dr. B. R. Ambedkar

आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह हा जाती निर्मूलनाचा एक मार्ग आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या Annihilation of Caste या ग्रंथात सांगितले आहे.

गेल्या काही वर्षांपासून आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह विषयक प्रश्नांची चर्चा महाराष्ट्रात चालू आहे. वेगवेगळ्या माध्यमांतून असे विवाह केलेल्यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. सभा, संमेलने, मोर्चे आणि शोधयात्रा या माध्यमातून आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांचे दुखणे

प्रस्थापित समाजापर्यंत आणि शासनापर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांच्यातील मंडळी करीत आहेत. परंतु अजूनही त्यांना हवं तसं यश मिळालेलं नाही. मात्र त्या निमित्ताने आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहाबाबत समाजात होत असलेली जागृती ही त्यातल्या त्यात मोठी जमेची बाजू आहे.

कोणत्याही समाजाच्या प्रश्नांचा विचार करीत असताना त्यांच्या समाज जीवनाकडे दुर्लक्ष करून चालत नाही. कारण त्यांचे अनेक प्रश्न हे त्यांच्या जनजीवनाशी निगडीत असतात. म्हणून त्यांच्या जगण्याची ओळख होणे आवश्यक वाटते. लग्न समारंभ हा आनंदाचा क्षण असतो. आपला समाज कितीही पुढारलेला असला तरी लग्नाचा जेव्हा विचार येतो तेव्हा जातीपातीचा, धर्माचा विचार केला जातोच. तरीही या सर्वांना डावलून तरूण-तरूणी आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करण्यासाठी पुढे पाऊल टाकत आहेत. समाजातील जातीयतेची दरी अजूनही रुंद आहे. जातीयता नाहीशी करण्यासाठी आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांना प्रोत्साहन दिले पाहिजे. अशा लग्नांमुळे दोन परंपरा, दोन संस्कृती एकत्र येतात. अतिवेगवान असा बदल आणि प्रगती हीच ज्याची खूण बनली आहे, अशा एकविसाव्या शतकात जातींच्या भिंती पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या रोटी-बेटीच्या होऊ घातलेल्या व्यवहाराबाबत सर्वच समाजाने सहृदयता दाखवावी आणि जातीय जाणीव बोथट करत त्यांना आंतरजातीय, आंतरधर्मिय विवाहांसाठी प्रवृत्त करावे. समाजातील जातीयता नष्ट करण्यासाठी आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहाला प्रोत्साहन द्यायला हवे. खरे तर आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह हे समाजातील जातीयता गाडण्यासाठीचा प्रखर उपाय असल्याचे मानले जाते. याचे कारण दोन विविध जातींमध्ये विवाह झाला तर केवळ दोन कुटुंबे एकत्र येत नाहीत, तर दोन जाती, दोन परंपरा, दोन कुटुंबे, दोन संस्कृती एकत्र येतात.

लग्न म्हणजे कर्तव्य बंधन नसून दोन मनाचे अतूट बंधन असते. पण आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहाचा विषय कुटुंबापर्यंत पोहोचतो तेव्हा त्यांचे रूपांतर विरोधामध्ये होते. याचे एकमेव कारण म्हणजे देशातील प्रखर जातीव्यवस्था. या जातीव्यवस्थेच्या दडपणामुळे कुटुंब सहकार्य करत नाही. समाजाचा दबाव त्या कुटुंबावर असतो. अशा स्थितीत कुटुंबाचा व समाजाचा विरोध पत्करून ही तरूण पिढी आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करण्यासाठी तसेच जाती-धर्माच्या भिंती पाडण्यासाठी पाऊल पुढे टाकत आहे. पण काही जोडप्यांना खुनी हल्ले, बहिष्कार, आत्महत्या, त्यांच्या कुटुंबियांना वाळीत टाकणे या सारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

गेल्या काही दशकात सुरू झालेल्या आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांच्या प्रक्रियेला आपण जाणीवपूर्वक गती देऊ शकलो तर जातीपातीत विभागला गेलेला आणि त्यामुळे खरी प्रगती करण्यात अडथळे येत असलेला देशातला समाज एक होईल. परिणामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पडलेले समानतेचे तत्त्व पाळणाऱ्या देशाचे स्वप्न सत्यात येईल. परंतु हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी समाजातल्या प्रत्येक घटकाने एकत्र येऊन प्रयत्न करून अशा प्रकारचे लग्न करणाऱ्या जोडप्यांना, त्यांच्या कुटुंबियांना आधाराचा हात देऊन पाठिंबा देणे अत्यावश्यक आहे. त्यादृष्टीने विविध स्तरावर विशिष्ट उद्देश डोळ्यापुढे ठेवून काम करण्यास गती मिळेल. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याच्या महिला बाल विकास विभागाने १३ डिसेंबर रोजी एका परिपत्रकाद्वारे राज्य पातळीवर 'आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह-परिवार समन्वय समिती' स्थापन करण्याचा निर्णय घेतला. याबाबत टीकेची झोड उठल्यानंतर सरकारने 'आंतरजातीय विवाह' या समितीच्या कार्यकक्षेतून वगळून आपला खरा धर्मांध अजेंडा स्पष्ट केला आहे.

ही समिती विविध प्रकारे आंतरधर्मीय विवाह केलेल्या व्यक्तींची इत्थंभूत माहिती घेऊन संबंधित मुली/महिला आणि त्यांच्या कुटुंबियांशी संपर्क करून त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देणार. नागरिकांच्या व्यक्तिगत जीवनात हस्तक्षेप करणाऱ्या या परिपत्रकाचा सर्व लोकशाहीप्रेमी व्यक्तींनी जाहीर निषेध केला. या संदर्भात स्त्रीमुक्ती आंदोलन संपर्क समिती, पी.यु.सी.एल .पुणे, युवक क्रांती दल, लोकशाही उत्सव समिती, एस.एफ.आय. पुणे कलेक्टिव्ह, डी.वाय.एफ.आय., गिरीमानस, जाती अंत संघर्ष समिती आणि यासारख्या अनेक समविचारी संस्था व संघटनांनी पुढाकार घेऊन पुण्याच्या गुडलक चौकात निवड स्वातंत्र्यावर हल्ला करणाऱ्या मनुवादी महाराष्ट्र सरकारचा निषेध करण्यासाठी

जाहीर सभा आयोजित केली होती.

Article 19 - right to freedom आणि article 21 the right to protection of life and personal liberty या संविधानाच्या कलमांचे देखील उल्लंघन केले आहे. सोबतच संविधानिक मूल्यांचादेखील जाणीवपूर्वक अपमान करण्यात आला.

आपल्या देशातील सर्व प्रौढ नागरिकांना आणि विशेषकरून स्त्रियांना व्यक्ती-स्वातंत्र्य देणाऱ्या राज्यघटनेचा हा घोर अपमान आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल, मंत्री आणि सत्ताधारी लोकप्रतिनिधी यांनी आजपर्यंत आपल्या जाहीर वक्तव्यातून राज्याच्या गौरवशाली सामाजिक सुधारणेच्या पाईकांचा जाहीर अपमान केला. आता मात्र ते त्यांच्या महान कार्याला किती तुच्छ लेखतात हे प्रत्यक्ष कृतीतून दाखवत आहेत. जातीव्यवस्थेला आणि धार्मिक भेदभावाला मूठमाती द्यायची असेल तर सामाजिक सरमिसळ आवश्यक असून, विविध समूहातले विवाहसंबंध वाढले तर ते अधिक चांगल्या पद्धतीने घडते हा अनुभव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीअंतासाठी नेमका हाच मार्ग सांगितला होता.

अशा विवाहात अडथळे आल्यास संबंधित नागरिक योग्य त्या मार्गाने मदत घेऊ शकतात. त्यादृष्टीने कौटुंबिक अत्याचार विरोधी कायदा आणि स्त्रियांच्या संरक्षणासाठी केलेल्या इतर विविध कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि यंत्रणा सरकारने सक्षम करायला हव्यात. ते सोडून सरकार नागरिकांचे लोकशाही हक्क-स्वातंत्र्य हिरावून घेत आहे. त्यामुळेच शिंदे-फडणवीस सरकारचा अंतस्थ हेतू स्पष्ट होतो. प्रत्यक्षात हे तथाकथित व्यासपीठ शासकीय यंत्रणेचा वापर करून नागरिकांच्या व्यक्तिगत जीवनात ढवळाढवळ करील. मुली/महिला यांच्यावर खास पाळत ठेवण्यासाठी, त्यांचे आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह मोडण्याचा आणि तथाकथित धार्मिक, जातीय 'शुद्धी' कायम ठेवण्याचा मनुवादी कार्यक्रम राबवण्यासाठी या समितीचा उपयोग केला जाईल याबद्दल शंका नाही.

या समितीला कोणत्याही धोरणाचा किंवा कायद्याचा आधार नसून, ती त्वरित बरखास्त करावी अशी मागणी करण्यात आली व सरकारचा तीव्र शब्दात निषेधसुद्धा करण्यात आला.

Right to Love या ओपन फोरमच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आंतरजातीय/आंतरधर्मीय प्रेमविवाह करणाऱ्या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी तसेच ऑनरकिलिंग संदर्भातील गुन्हे रोखण्यासाठी हरियाणाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात 'सुरक्षित घरे' (Safe Houses) स्थापन करण्यात यावीत, याबाबत मा. अध्यक्षा महिला आयोग, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देण्यात आले आहे.

सद्यस्थितीत युवा पिढी आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करण्यासाठी पाऊल पुढे टाकत आहे. मोठ्या प्रमाणात आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करण्याचे प्रमाण वाढले आहे. शिक्षण, नोकरी या कारणाने तरूण पिढी घरापासून लांब राहते व जेथे ते शिक्षण घेतात किंवा नोकरी करतात त्या ठिकाणी अनेक ठिकाणाहून आलेले विविध जाती-धर्माचे लोक एकत्र राहतात. अशा रीतीने एकमेकांच्या सानिध्यात राहून जवळीक निर्माण होते. नातेसंबंध, प्रेमसंबंध प्रस्थापित होतात. हेच नातेसंबंध, प्रेमसंबंध नंतर आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करण्यास युवापिढीला प्रवृत्त करतात.

लग्न म्हणजे कर्तव्य बंधन नसून दोन मनाचे अतूट बंधन असते. पण हा विषय कुटुंबापर्यंत पोहोचतो तेव्हा त्यांचे रूपांतर विरोधामध्ये होते. याचे एकमेव कारण म्हणजे देशातील प्रखर जातीव्यवस्था. या जातीव्यवस्थेच्या दडपणामुळे कुटुंब सहकार्य करत नाही. समाजाचा दबाव त्या कुटुंबावर असतो. अशा स्थितीत कुटुंबाचा व समाजाचा विरोध पत्करून ही तरूण पिढी आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करण्यासाठी तसेच जाती-धर्माच्या भिंती पाडण्यासाठी पाऊल पुढे टाकत आहे. पण काही जोडप्यांना खुनी हल्ले, बहिष्कार, आत्महत्या, त्यांच्या कुटुंबियांना वाळीत टाकणे या सारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यात जमेची बाजू म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाकडून आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांना ५०,०००/- रुपयांचे आर्थिक प्रोत्साहनसुद्धा देण्यात येत आहे.

भविष्यकालीन कृती आराखडा

समाजातील अनेक विवाह हे प्रेमप्रसंगातून निर्माण झालेले असतात. त्यात जातीनिर्मूलनाची जाणीव असतेच असे नाही. जाणीवपूर्वक आंतरजातीय विवाह करणाऱ्या लोकांची संख्या वाढावी हा हेतू ठेवून समाजात याबाबतचे प्रबोधन व्हावे यासाठी विविध समाज घटकांचे प्रशिक्षण करणे आवश्यक आहे. आंतरजातीय विवाहासाठी चळवळ करणारे कार्यकर्ते आणि संस्था, संघटना यांच्या प्रतिनिधींना देखील लग्न लावून देताना येणाऱ्या अडचणी तसेच योग्य समुपदेशनाची माहिती नसते. हे सर्व लक्षात घेता आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांना मान्यता, प्रतिष्ठा, संरक्षण, मदत हे लक्ष्य डोळ्यासमोर ठेऊन हे प्रशिक्षण

असावे.

या शिवाय आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांचा राज्यस्तरीय मेळावा घेणे. महाविद्यालयीन विद्यार्थी किंवा या विचारांनी विवाह करू इच्छिणारे तरूण-तरूणी यांचे ऐच्छिक समूह तयार करून जाणीव जागृती करणे, प्रबोधन करणे, कायदेतज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, सामजिक कार्यकर्ते (MSW), निबंधक (विवाह नोंदणी अधिकारी), संशोधक, अभ्यासक यांना या कार्यात सहभागी करून घेणे, विविध कार्यालयातील (शासकीय, निमशासकीय, खाजगी इ.) आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह केलेल्या कर्मचाऱ्यांची तसेच या विषयाची माहिती असणाऱ्या कर्मचाऱ्यांची समिती गठीत करणे जरूरीचे आहे.

व्यक्ती, संस्था, संघटना, शासकीय व निमशासकीय कार्यालयांना भेटी देऊन जास्तीत जास्त माहिती गोळा करण्याचा सरकारकडून प्रयत्न होईल. त्यानुसार आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांच्या याद्या तयार करण्यात येतील.

आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांची online form द्वारे माहिती संकलित करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक कोपऱ्यातून नोंदणी करण्यात आली आहे. या मिळालेल्या माहितीच्या आधारे आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांच्या शासनाकडून असणाऱ्या अपेक्षा पुढीलप्रमाणे मांडण्यात आल्या आहेत.

* शासनाकडून आंतरजातीय विवाहित जोडप्यांना अनुदाना व्यतिरिक्त आर्थिक मदत मिळावी. राज्य शासनाचे जे ५०,०००/- रूपये अनुदान मिळते त्यात वाढ व्हावी. हे अनुदान लवकरात लवकर मिळावे. तसेच त्यासाठी कागदपत्रांची संख्या देखील कमी व्हावी.

* असे विवाह केलेल्यांना शासकीय नोकरीत आरक्षण असावे. त्यांना शासनाच्या नोकरीत समाविष्ट करावे. या संदर्भात समाजात वेगाने व जास्तीत जास्त जागृती व्हावी.

* जातीचे बंधन न ठेवता आपल्या मनानुसार जोडीदार निवडण्यास मुभा असावी. अशा विवाहाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष बाब तयार करण्यात यावी, तसेच प्रमाणपत्र online मिळावे.

* दोघांची लग्नाची तयारी असेल व कौटुंबिक विरोध असेल तर शासनाने संरक्षण देऊन असे विवाह लावून देण्यासाठी पुढाकार घेऊन मदत करावी.

* जिल्हा, तालुका, ग्रामपंचायत आदी ठिकाणी आंतरजातीय विवाहितांसाठी कार्यालये सुरू करण्यात यावी. जेणेकरून अटीतटीच्या वेळी लगेच मदत व सहकार्य मिळू शकेल. असे विवाह केलेल्यांना सामाजिक सुरक्षितता मिळावी.

* आंतरजातीय विवाहितांच्या मुलांसाठी विशेष कोटा असावा.

* उपलब्ध सर्व योजना शासनाने व्यवस्थित हाताळल्या पाहिजेत.

* सामाजिक आणि आर्थिक संरक्षण मिळावे.

* कालांतराने समान नागरी कायदा अस्तित्त्वात आणावा.

आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणे म्हणजे गुन्हा नाही. अशा विवाहांमुळे समाजातील जातीयता नष्ट होते. त्यामुळे जास्तीत जास्त आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह होण्यासाठी आणखी वेगवेगळ्या रणनीती आखाव्यात.

* असे विवाह करणाऱ्या जोडप्यांना पोलीस संरक्षण मिळावे. तसेच पोलीस संरक्षणात असेपर्यंत निवासाची सोय व्हावी. अनुदान मिळेपर्यंत जोडप्यांची सर्व जबाबदारी शासनाने घ्यावी.

* समाजाला प्रेरणा, सहकार्य व संविधानिक मूल्ये या विषयावर शासनाकडून प्रबोधन व्हावे. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांना इतर जोडप्यांसारखी समाजात वागणूक मिळावी.

* आंतरजातीय विवाहित महिलांना पेन्शन योजना सुरू करावी. अशा महिलांच्या अपत्यांना सरकारी नोकरीत जागा आरक्षित करावी.

* अशा विवाहातून दोन समाजाला, जातींना, धर्मांना एकत्रित आणण्याचे काम केले जाते. म्हणून अशा विवाहांसाठी शासन स्तरावर पाठबळ मिळायला हवे.

* आंतरजातीय वा आंतरधर्मीय विवाह हे जात किंवा धर्म पाहून केले जात नाहीत, तर प्रेम असते म्हणून केले जातात. म्हणून अशा विवाहांकडे केवळ एका विशिष्ट दृष्टीकोनातून पाहिजे जाऊ नये. आंतरजातीय वा आंतरधर्मीय विवाह करणे यात गैर काही नाहीच. समाजाने व संबंधित कुटुंबांनी यात पुढाकार घेऊन त्याचा स्वीकार करायला हवा. जातीयतेचे मूळ नष्ट केल्यास आपण समाजात समानता आणू शकतो, याची जाणीव ठेवायला हवी.

* आंतरजातीय वा आंतरधर्मीय विवाह केल्यानंतर 'माझा पुनर्जन्मच झाला असे वाटते', अशा प्रकारची भावना असे

विवाह केलेल्या जोडप्यांनी व्यक्त केली आहे.

* शासकीय कागदपत्रांवर कोणतीही जात, धर्म नमूद न करता फक्त 'भारतीय' असा उल्लेख असावा. अशा जोडप्यांचे कौटुंबिक समुपदेशन शासनाकडून व्हावे त्यासाठी MSW ची समुपदेशक/सामाजिक कार्यकर्ता म्हणून vacancy काढण्यात यावी. तसेच प्रत्येक विभागात स्वतंत्र कार्यालय तयार करून आंतरजातीय विवाहितांची समिती असावी. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांविषयी प्रचार, प्रसार, जनजागृती, प्रबोधन यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मदत घ्यावी. यातून समाजात परिवर्तनाला मोठी मदत होईल.

* ऑनर किलिंगच्या घटना घडू नयेत, म्हणून अशा प्रकरणातील दोषींना कठोर शासन करावे तसेच कडक कायदा तयार करून त्याची अंमलबजावणी व्हावी.

* आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह केलेल्यांचा वर्षातून एकदा राज्यस्तरीय मेळावा राज्य शासनाच्या सामजिक न्यायमंत्री यांच्या उपस्थितीत व्हावा. अशी विवाह नोंदणी सुलभ करावी. आंतरजातीय विवाहाच्या संदर्भात कमीत कमी कागदपत्रे लागतील याची नोंद शासनाने घ्यावी.

* समाज व कुटुंबाच्या विरोधात जाऊन लग्न करणे खूप अवघड आहे. पण सकारात्मक पुढाकार घेऊन शासनाने मदत केली तर जातीमुक्त समाज अस्तित्त्वात येईल. समाजाच्या मनात आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहाच्या संदर्भात जे गैरसमज आहेत किंवा जो विरोध आहे तो नष्ट होण्यासाठी प्रयत्न व्हावेत. असे विवाह करणाऱ्यांच्या कुटुंबियांना, नातेवाईकांना समुपदेशन करून दोघांमध्ये समन्वय घडवण्यास शासनाने पुढाकार घ्यावा.

* शासनाने वेळोवेळी आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहाच्या संदर्भात वेगवेगळ्या विषयावर संशोधन करावे. तसेच त्या संशोधनाचे अहवाल शासनास सादर करून प्रसिद्ध करावे. जेणेकरून शासनातर्फे या विषयावर काय काम सुरू आहे, याविषयीची माहिती मिळेल.

* असे विवाह केल्याने कोणतेही नुकसान होत नाही. तरी देखील एवढा विरोध का असावा? समाजाने लग्नाचे महत्त्व समजून घ्यावे. प्रेम हे प्रेम असते, सर्वांचे सेम असते.

* केंद्र शासनाची जी योजना आहे त्यामध्ये महाराष्ट्रातील जोडप्यांना अनुदान मिळण्यासाठी राज्य शासनाने प्रयत्न करावेत. तसेच या योजनेत जी Hindu Marriage act नुसारच लग्न नोंदणी असावी ती अट रद्द करण्यात यावी. आंतरजातीय विवाह या विषयावर काम करणाऱ्या सामाजिक संस्था व संघटना यांच्या मदतीने आंतरजातीय विवाहितांचे support group शासनाने तयार करावेत.

* बरेच आंतरजातीय विवाह हे नोंदणी, वैदिक,सत्यशोधक, आर्य पद्धत, बौद्ध अशा विविध पद्धतीने होतात. आंतरजातीय विवाह हे सत्यशोधक पद्धतीने व्हावेत, यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा. त्यासाठी सत्यशोधक पद्धतीने आंतरजातीय विवाह लावून देणाऱ्या संस्था, संघटना यांच्याशी शासनाने समन्वय करावे.

* काही जोडप्यांना आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहानंतर कौटुंबिक बहिष्कार, नातेवाईकांचा बहिष्कार, प्रसंगी समाजाचा बहिष्कार अशा विविध समस्यांचा सामना करावा लागतो. काही जोडप्यांना तर पोलिसांची मदत घ्यावी लागते तर काही जोडप्यांच्या विरोधात कुटुंबियांकडून तक्रार केली जाते. काही प्रकरणात मुलीच्या कुटुंबियांकडून मुलाच्या कुटुंबियांवर तक्रार दाखल केली जाते. अशा प्रकरणामध्ये वेळीच समुपदेशन व योग्य ती कारवाई केली जायला हवी.

* असे विवाह केल्यानंतर सामाजिक व कौटुंबिक बहिष्काराचा सामना जोडप्यांना करावा लागतो. त्यांना सण-समारंभांना बोलावले जात नाही. हे लक्षात घेऊन शासनाने अशा विवाहितांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करावे. त्याद्वारे त्यांना सण-समारंभाचा आनंद घेता येईल.

वरील उपाययोजनांचा भर दिला गेल्यास आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांना मोठा दिलासा मिळू शकेल. तसेच अशा विवाहांना प्रोत्साहन मिळून त्यांची संख्या वाढत राहील आणि एकात्म समाज निर्मितीला चालना मिळेल.

(लेखिका टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबईच्या पी.एच.डी. स्कॉलर आहेत.)

- शिल्पा शिवणकर कांबळे
ई-मेल : shivankar.shilpa@gmail.com.

राजकीय

चोवीस नव्हे; शहाण्णव तास... फक्त सत्तेचे राजकारण

सुनील बडुरकर

सत्तेविना बाहेर बसून राहणे भाजपला मान्य होत नाही. सत्ता हातात येणार नसेल तर मग पक्ष आणि राजकारण हवेच कशाला, या विचाराने, वृत्तीने भाजप अविरत काम करत असतो. चोवीस तास राजकारण हा गुण शरद पवार यांच्या नावावर लावला जातो. पण चोवीस नव्हे, तर एका दिवसात शहाण्णव तास फक्त सत्तेचे राजकारण हे भाजपचे मूळ सूत्र आहे. सत्तासंघर्षावरून ज्या घटना घडत असतात, त्यातील एकही घटना तत्कालीन, प्रासंगिक वा अकस्मात घडत नसते. तर भाजप हा पक्ष त्या घटनेसाठी किमान तीन ते दहा वर्षे तयारी करीत असतो. समोर जी घटना दिसते, ती फक्त त्या पूर्वनियोजित आखणीचा आविष्कार असतो. कोणतीही लहान-मोठी गोष्ट असो, कोणताही निर्णय असो, एका बाबीला चार पर्याय व्यवस्थित तयार करून तत्पर ठेवलेले असतात. असे एकास चार या गुणकारात चौसष्ट पर्याय प्रारंभीच पटलावर ठेवून भाजप राजकीय खेळ्या करत असतो. कोणत्याही राज्यातील निवडणुकीतील घटनाक्रम पाहिले, तर त्यातील काहीही अचानक घडले नव्हते, हे दिसू लागते. जे करायचे, त्यासाठी लागणारी प्रचंड ताकद भाजपकडे आहे. पण ती ताकद नेमकी काय?

सलग तीन वर्षे सबंध महाराष्ट्र अनेक प्रकारच्या गुंतागुंतीने गांगरलेला आहे. विधानसभा निवडणूक झाल्यानंतर महाराष्ट्राला स्थैर्य मिळावे, लोक समाधानी व्हावेत, अशी साधारण अपेक्षा होती. पण कोविड रोगाच्या साथीने समाधान तर दूरच, उलट आणखी नवीन तणाव आणि संकटे उग्र बनत गेली. व्यवसाय, उद्योग, वाहतूक इत्यादी सुरळीत होऊन पुढे झेपावण्याचे मनसुबे रचले जात असतानाच महाराष्ट्रात राजकीय सत्तांतर झाले.

हुकलेली संधी साधत भाजप परत येनकेनप्रकारेण सत्ता खेचून घेणार, हे पहिल्या दिवसापासून गृहीत होतेच. कारण सत्तेविना बाहेर राहणे भाजपला मान्यच होत नाही. सत्ता हातात येणार नसेल तर मग पक्ष आणि राजकारण हवेच कशाला, या विचाराने, वृत्तीने भाजप काम करीत असतो. चोवीस तास राजकारण हा गुण शरद पवार यांच्या नावावर लावला जातो. पण चोवीस नव्हे, तर दिवसात शहाण्णव तास फक्त सत्तेचे राजकारण हे भाजपचे मूळ सूत्र आहे.

महाराष्ट्रात सत्तासंघर्षावरून ज्या घटना घडल्या, त्यातील एकही घटना तत्कालीन, अकस्मात घडलेली नव्हती. भाजप हा पक्ष त्या घटनेसाठी किमान तीन ते दहा वर्षे तयारी करीत असतो. आज समोर जी घटना दिसते, तो त्या पूर्वनियोजित आखणीचा फक्त आविष्कार असतो. कोणतीही लहान-मोठी गोष्ट असो, कोणताही निर्णय असो, एका बाबीला चार पर्याय व्यवस्थित तयार करून तत्पर ठेवलेले असतात. असे एकास चार या गुणकारात चौसष्ट पर्याय एकदाच पटलावर ठेवून भाजप राजकीय खेळ्या करत असतो. कोणत्याही राज्यातील निवडणूक घ्या. त्यातील सर्व घटनाक्रम पाहिले, तर त्यातील काहीही अचानक घडलेले नव्हते, हे दिसायला लागते. जे करायचे आहे, त्यासाठी लागणारी प्रचंड ताकद भाजपकडे आहे. पण ती ताकद नेमकी काय, यावर सहसा विचार केला जात नाही.

डेटा हेच शस्त्र

सध्याचे जग आधुनिक आहे व ते तंत्रज्ञानांनी समृद्ध आहे. या जगात राज्य चालवण्यासाठी सर्व प्रकारच्या माहितीचा साठा आणि नेटवर्क याला प्रचंड महत्त्व आहे. हजारो तपशील, संदर्भ असलेला डेटा आयता

हातात तयार असणे, म्हणजे जगावर राज्य करण्याचे शस्त्र हातात असणे. या डेटा शस्त्राचे प्रचंड मोठे बळ भाजपकडे आहे. भाजपची आयटी सेल नुसती सोशल मिडीयापुरती मर्यादित नाही. पक्ष म्हणून जे अखंड काम करावे लागते, त्या सर्व बाबींसाठी नित्यनेमाने प्रत्येक क्षणी असा डेटा संकलित केला जातो. भाजपची ही ताकद अद्यापही बाकी पक्षांनी नीटपणे ओळखलेली नाही आणि जरी ओळखली असेल, तरी तिचा आवाका त्यांना कळत नाही. अशी ताकद आपला पक्ष का कमावू शकत नाही, याचे उत्तर कोणत्याही राजकीय पक्षाकडे नाही. त्यामुळे भाजपला कोणत्याही मुद्द्यावर शह देण्यात सर्व राजकीय पक्ष कुचकामी ठरत आहेत.

काही दिवसांपूर्वी वर्तमानपत्रांतून ठळक मथळ्यांनी बातम्या प्रसिद्ध झाल्या, की पश्चिम बंगालमध्ये मागील बारा-पंधरा वर्षांत भाजपसारख्या कट्टर वैचारिक शत्रू सोबत तेथील डाव्यांनी उघड युती केलेली आहे. २०१४च्या निवडणुकीच्या वेळी हे सत्य अनेक राजकीय कार्यकर्त्यांना सांगण्याचा मी प्रयत्न केला. पण ठार अज्ञान असल्यामुळे त्यावर कुणी विश्वास ठेवत नव्हते. कम्युनिस्ट पक्षाचे नेते इंद्रजीत गुप्ता केंद्रीय गृहमंत्री असतानाचा एक किस्सा आठवतो. लातूर जिल्ह्यातील दोन मित्र कार्यकर्ते (भाजपचे) आपसांत बोलत होते. एक मित्र सांगत होता, ''संसदेत बसलेले हे बारा कम्युनिस्ट आता म्हातारे झालेत. हे एकदाचे गेले, की नंतर अख्खी संसद आमच्याच ताब्यात असणार आहे. बारा मोठे कम्युनिस्ट संपावेत हे एक स्वप्न आणि राजकीय धोरण असू शकते, हे कुणाला तरी बाहेर समजेल काय? संपूर्ण संसदेत एकही कम्युनिस्ट असता कामा नये, हा विचार तर झालाच. पण कम्युनिस्ट सोडून बाकी कुणीही संसदेत असल्याने काही फरक पडत नाही. संपूर्ण संसदच मुठीत येणार असते. या प्रकारचे धोरण जिल्ह्यात बसलेल्या त्या भाजपच्या समर्थक कार्यकर्त्यापर्यंत पोहोचलेले असते. त्यावरून एकंदर डावपेच किती कुटील असतात, हे लक्षात येते.

भाजपचा डावा गिअर

अटलबिहारी वाजपेयींच्या सत्ता काळात भाजपची 'फील गुड' आयडिया आली. तिलाच सध्या 'अच्छे दिन' या नावाने प्रचलित करण्यात आले आहे. तेव्हा ही आयडिया फसली होती. त्यामुळे कधी नव्हे ते कम्युनिस्ट पक्षांचे साठ खासदार निवडून आले होते. मग संसदेचे असे दृश्य भाजपला कसे मानवणार? निमित्त घडले अणुऊर्जा करारावर स्वाक्षरी

सत्याग्रहीची प्रतिज्ञा

**मी भारतीय आहे याचा मला गर्व आहे आणि
मी सत्याग्रही परिवाराचा सभासद आहे
याचा मला अभिमान आहे. सच्चेपणाला
माझा पाठिंबा असतो. लुच्चेपणाला माझा
विरोध असतो. प्रामाणिकपणाचे मी कौतुक
करतो. ढोंगीपणाचा मी निषेध करतो.
कायद्याचा आदर करणे मला आवडते.
भ्रष्टाचाराचे समर्थन मला शिसारी आणते.
राजकारणाविषयी जागरूक राहणे हे मी
कर्तव्य मानतो. राजकारणाविषयी उदासीन
राहणे मला घातक वाटते.
आशावादी असणे आरोग्याचे लक्षण.
निराशावाद हे आजारपण.
जातीयवाद समाजात फूट पाडतो. धर्मांधता
देशाचे तुकडे करते.
विचारांच्या डबक्याला दुर्गंधी असते. उन्मुक्त
विचारांचे झरे खळखळ वाहत राहिले तर
मला प्रसन्न वाटते.
दुसऱ्यांच्या वेदनेने मला पीडा होते.
असा मी, असा मी !
म्हणूनच मी सत्याग्रही परिवाराचा सभासद
आहे. त्याचा मला अभिमान आहे.
सत्याग्रही माझं व्यासपीठ आहे.
सुसंस्कृतपणाचा आविष्कार आहे.
सत्याग्रही परिवार वाढवायचा आहे.
सत्यामागे सामर्थ्य उभे करायचे आहे.
म्हणूनच आवाहन आहे.
आपण सत्याग्रही परिवाराचे
सभासद बना.
इतरांनाही सभासद करून घ्या.**

करण्याचे! कम्युनिस्टांनी सरकारचा पाठिंबा काढला. ते युपीए सरकारमधून बाहेर पडले. सत्ता सोडली. ज्योती बसूंनी पंतप्रधान होण्यास नकार देणे, त्यांना नकार द्यायला भाग पडणे, ही जशी घोडचूक होती. तशीच डाव्यांनी अणुऊर्जा कराराचे कारण सांगत युपीएमधून बाहेर पडणे, हीसुद्धा त्यांची राजकीय घोडचूकच होती. पण तेव्हा त्यांना वीरश्री बहाल करण्यात आली.

कम्युनिस्टांचे हे वर्तन तेव्हाही संशयास्पद वाटत होते. भाजप हा त्यांना शत्रू वाटत नव्हता, तर ममता बॅनर्जी त्यांना कर्दनकाळ वाटत होत्या, वाटतात. एक प्रकारे तेव्हा भाजपने कम्युनिस्ट पक्षासोबत जाणकारांना उघडपणे जाणवणारी छुपी युती केली होती. हिंदुत्वाच्या विरुद्ध, एकानुवर्ती फॅसिझमच्या विरुद्ध असलेल्या पक्षासोबत देखील भाजप युती करू शकतो, हे भाजपचे खरे ताकदवान रूप आहे. पण लोकांमध्ये ही युती चांगली हे सांगताना त्याचे श्रेय भाजपला घ्यायचे आणि युती जर वाईट सिद्ध करायची असेल तर त्याचे पातक डाव्यांच्या डोक्यावर मारायचे, याची सोय भाजपने आधीच पेरून ठेवलेली असते.

महाराष्ट्राचा खेळ

ममता बॅनर्जी यांना व्हिलन स्वरूपात सादर करणे सुरूच आहे. ममताच्या शक्तीचा निःपात करण्यासाठी आमची युती आहे, असे भाजप-कम्युनिस्ट म्हणत आहेत. अशीच गंमत भाजपने महाराष्ट्रात केली. म्हणजे, उद्धव ठाकरेंनी भाजप सोबतची युती तोडली, म्हणजे त्यांनी हिंदुत्व सोडले आणि चक्क मुस्लिमांचे लांगुनचालन करणाऱ्या काँग्रेस-राष्ट्रवादी सोबत युती करून जणू देशद्रोहच केला, या सूत्राची पेरणी पद्धतशीरपणे गावोगाव करण्यात आली.

राज्यात पुन्हा एकदा हिंदुत्वाचे सरकार आणण्याचे आहे, म्हणून आम्ही एकनाथ शिंदे या कट्टर हिंदुत्ववादी नेत्याला मुख्यमंत्री केले, असे भाजप म्हणत आहे. पण उघड सत्य हेच आहे, की सत्ता ताब्यात घेण्यासाठी भाजप कुणालाही सोबत घेऊ शकतो, कुणाच्याही सोबत जाऊ शकतो. मायावतींचा बहुजन समाज पक्ष, नितीश कुमार यांचा संयुक्त जनता दल, इकडे शिवसेना, पंजाबमध्ये अकाली दल अशा प्रत्येक वेगळ्या विचारांच्या पक्षासोबत भाजपने युती केली आहे. जे राजकीय पक्ष हिंदुत्ववादी भूमिका घेत नाहीत, त्यांच्याशीही भाजप बिनदिक्कतपणे युती करू शकतो. 'हिंदू राष्ट्रवाद' यापेक्षा सत्तेची सूत्रे आपल्या ताब्यात असली पाहिजेत, हे धोरण भाजपने मागच्या चाळीस वर्षांत मोठे केले आहे. भाजपच्या सत्ताकांक्षी

धोरणाला अधिक जटील आणि कुटील करण्यासाठी गुजरात पॅटर्न बनवण्यात आला. भाजपची सूत्रे दिल्लीकडून, उत्तर प्रदेशकडून आणि नंतर गुजरातकडे वळवण्यात आली. 'अटलबिहारी-अडवाणी युग' हा शब्द वापरायचा झाला, तर असे म्हणावे लागेल की 'गुजरात पॅटर्न'मुळे त्या युगाचा अंत झाला.

गुजरात हा प्रामुख्याने व्यावसायिकांचा आणि व्यापाऱ्यांचा प्रांत म्हटला जातो. राजकारण हे व्यापारी पद्धतीने करायचे. पक्षीय पद्धतीने करायचे नाही. गुंतवणूक आणि मिळकत या फॉर्म्युल्यावर करायचे. विचार, तत्त्व, नैतिकता, नीतिमूल्ये इत्यादींवर अवलंबून राहायचे नाही. त्याचप्रमाणे पक्षाची त्यांची रचना असते. त्यावरही अवलंबून राहायचे नाही. उद्योग-व्यावसायिक क्षेत्रात जसे आऊट सोर्सिंग अपरिहार्य ठरवण्यात आले, तसे राजकीय पक्षाच्या कामात भाजपने 'आऊट सोर्सिंग' चालू केले. पक्षाचे कार्यकर्ते, सदस्य जे काम करतात, ते आऊट सोर्सिंगमधून करायचे. या सगळ्या बाबींना 'गुजरात पॅटर्न' म्हटले जाते. 'राजकारणाचे गुन्हेगारीकरण' हा मुद्दा कधी नव्हता, 'राजकारणाचा व्यवसाय' हाच मुद्दा होता. गुन्हा हासुद्धा व्यवसायच असतो. राजकारण हा व्यवसायच असतो. हे सर्व व्यवसाय म्हणूनच करायचे. त्यासाठी व्यावसायिक नफा-तोटा गणितच वापरायचे. कमीत कमी खर्चात नसेल, पण कमीत कमी वेळेत प्रचंड नफा यासाठी राजकारण हे 'गुजरात पॅटर्न'चे मुख्य सूत्र आहे.

२०१४ साली महाराष्ट्रात भाजप-शिवसेना सरकार स्थापन झाले. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. या सरकारचा पहिला निर्णय होता, गोवंश हत्या बंदीचा. भाजपच्या मतदारांना हे वाटू शकते, की हा हिंदुत्ववादी विचार आहे. गायीची हत्या म्हणजे धर्मद्रोह, पाप वगैरे. पण गोवंश म्हणजे गाय नसते. बैल मारला जातो. त्याचे मांस विकले जाते. भारतात बैलाचे मांस सर्वाधिक गरजेचे खाद्य आहे. त्याचे मार्केट अब्जावधी रुपयांचे आहे. बैलाच्या मांसाला जगभरात मागणी आहे. त्याच्या निर्यातीचा टर्नओव्हर अब्जावधींच्या हिशेबात असतो. या व्यवसायावर राज्य करणाऱ्या कंपन्याचे मालक सरसकट मुस्लीम नाहीत. उलट बरेच मालक हिंदू जैनही आहेत.

उद्योगास लागणारा कच्चा माल स्वस्तात मिळवण्यास प्रत्येक उद्योजक धडपड करत असतो. मांस निर्यात करणाऱ्या उद्योगांना स्वस्तात बैल मिळावेत, यासाठी त्यांच्या हत्येचे कारण करून बंदी घालण्यात आली. अधिकृत लायसन्स, परवानगी इत्यादी प्रक्रिया न करता, बैल कत्तलखान्याकडे नेता येत नाहीत. गावोगावच्या जनावरांच्या बाजारात होणारी विक्री बंद पडत

जाणार आहे. सांभाळता येत नाही म्हणून पशुपालक जनावरे रस्त्यावर सोडून देतात. याच समांतर काळात केंद्र सरकारचे धोरण आलेले आहे, ते गायरान जमीन एनजीओंना देण्याचे. जंगले, हिरवळ, गायराने ही बैल सांभाळण्यासाठी देण्यात येत आहेत. याचा उद्देश गायीच्या वंशाला एका विशिष्ट बिझिनेस चेनमधून कंट्रोल करणे.

सामान्य मटण विक्रेत्यांच्या हातातून हा व्यवसाय हिसकावून घेण्यात आलेला आहे. त्यामुळे सामान्य ग्राहकांच्या पोटाला हे अन्न महाग पडत आहे. त्याच वेळी अचानक जैन समाज रस्त्यावर येतो. मध्येच इशारे मिळतात, की आमच्या सणाच्या काळात मटणाची दुकाने बंद करा. टोमॅटो, कांदे जसे मार्केटमधून स्वस्तात उचलण्यासाठी भाव पाडले जातात, तसेच पशू विक्रीचा दर कमी करून स्वस्तातील पशू हे कंपन्यांना मिळावेत, हा छद्मी डाव खेळला जातो. या सूत्रात २०१४ सालात महाराष्ट्र सरकारने बंदी आणलेली आहे.

सर्वंकष ताबा हेच उद्दीष्ट

महाराष्ट्रात सत्तांतर होऊन एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी घेतलेले पहिले दहा निर्णय तपासून पहा. रखडलेले प्रकल्प या शब्दाखाली टेंडर्स पुढे रेटणे, विकास प्रकल्पांना कर्ज उभारणीस सढळ मान्यता देणे, पाणी-जंगल-खाणी याबद्दलच्या सर्व प्रकल्पांना झटपट मान्यता देणे, असे निर्णय त्यात आढळतील. त्यातही विदर्भातील ऊर्जा प्रकल्पाला किती हजार कोटीची मान्यता मिळाली, हे समजले की नवीन सरकारच्या परत सत्तेत येण्याचे इंगितही कळू शकते.

महाराष्ट्रातील या गोष्टी म्हणजे शितावरून भाताची परीक्षा यासाठी पहाव्यात. म्हणजे संबंध भारतात वेगवेगळ्या राज्यांत सत्तेसाठी भाजप काय काय उलथापालथ करत आहे, हे कळू

शकते. एकही विषय, क्षेत्र, व्यवसाय, जिल्हा, विभाग, प्रांत एवढेच नव्हे, तर गावे आणि गावातील कुटुंबेसुद्धा सत्तेच्या सूत्रात आपल्याच हाती असली पाहिजेत, हा भाजपचा 'गुजरात पॅटर्न' आहे. प्रत्येक गावात काही व्यक्ती, कुटुंब हे सुव्यवस्थित असतात. त्यांच्याकडे त्या भागातील राजकारण वळलेले असते. संस्था असतात, जमिनी असतात. त्या सर्व गोष्टी भाजपला आपल्याकडे खेचायच्या असतात. मग सलग दहा-बारा वर्षे त्या-त्या भागात अशा केंद्रावर काम केले जाते. तेथील वीण उसवली जाते. यंत्रणा, माणसे, कुटुंबे, हतबल केली जातात. गाव पातळी, तालुका पातळीवर कार्यरत एक-एक व्यक्तीला गाठून, भ्रम पेरून भाजपच्या गोटात ढकलण्यात येते. संबंधित व्यक्ती वा संस्था सरळपणे येत नसतील तर आडवा हात करण्याला अजिबात कचरायचे नाही. याचा अनुभव देणाऱ्या शेकडो घटना आहेत.

विषय एस. टी. कामगारांचा होता. त्या खात्याचे मंत्री, अधिकारी सोडून बायकांचा मोर्चा थेट शरद पवार यांच्या घरावर नेण्यात आला. त्यावेळी शरद पवार यांच्याबद्दल किती जण अश्लाघ्य बोलत होते, याची गणतीच नव्हती. असे होण्याचे कारण काय तर महाराष्ट्रात दबदबा असलेले नेते आणि घराणे म्हणून शरद पवार यांना देशात ओळखले जाते. त्यांचे हे राजकीय दडपण संपवून टाकणे, हे त्यामागचे कारस्थान होते. नेते गोपीचंद पडळकर काय, नटी केतकी चितळे काय, त्यांनी बोलण्याचा सुमार सोडलेला आहे. २०१४ च्या आधी कुणाच्या मनात तरी असे शब्द येत होते काय?

आणखी एक उघड गुपित आहे, की ईडी कार्यपद्धत आता नजरेस येत आहे. पण २०१४ च्या आधीच ईडीने नोटीस पाठवणे सुरू केले होते. उद्धव ठाकरे यांनाही नोटीस होतीच. नारायण राणेंसह महाराष्ट्रातील लहान-सहान सत्ता केंद्रांना हेरून नोटीस यादी बनलेली होती. त्यामुळेच पुढची निवडणूक विनासायास पार पडली. मिडीयामधून विश्वगुरूचा चेहरा आणि खाली ग्राउंडवर मात्र एक एक गळ टाकत जाणे.

सत्तेचे बजेट

प्रत्येक पक्षाकडे त्यांची एक आर्थिक मदतीची पद्धत असते. राष्ट्रवादीचे स्रोत हे प्रफुल्ल पटेल यांच्याकडे आहेत. ऐन निवडणुकीत पटेलांना जाम करण्यात आले. रसद बंद पडली. राष्ट्रवादी पक्ष जागच्या जागीच स्तब्ध झाला. काँग्रेस पक्षाची गत तर याहून वाईट. प्रत्येक तालुक्यातील लहान-मोठे नेते चिडीचूप आहेत. काँग्रेसच्या नेत्यांकडे संस्थांचे, आस्थापनचे मोठे जाळे होते. मनुष्यबळ, मालमत्ता जमिनी सगळे होते. या सगळ्या आयत्या मत्तांचा मक्ता सहजपणे हातात यावा, यासाठी ज्या यंत्रणा राबवल्या जातात, त्यामध्ये प्रचंड मोठी गुंतवणूक केली जाते. एकाच वेळी कोट्यवधी रुपयांचे बजेट इन्व्हेस्टमेंट, रिटर्न्स आणि टायमिंग यांचे त्रैराशिक मांडले जाते. हे काम कॉर्पोरेट पद्धतीने चालवले जाते, याचेही टेंडर्स असतात. मिडियासाठी पॅकेजेस असतात.

राज्यशास्त्रापल्याडचे सारे काही

इथेही एक किस्सा सांगायचा आहे. एकदा पुणे प्रवासात टॅक्सी चालकाशी गप्पा करताना विचारले, ''मग इलेक्शनमध्ये मतदान इत्यादीमध्ये लक्ष दिले की नाही, कमाई झाली का?''

त्याने आनंदाने सांगितले, ''होय सर, झाली. आमच्या गावातील पावणे दोनशे घरांचे काम मी केले''.

''म्हणजे काय केले?''

''सहा महिन्यांपासून मला पैसे मिळत होते. त्या घरातील लोकांना चहा-पाणी मदत, नमस्कार, स्वागत इत्यादी करत राहायचे. त्यांची सविस्तर माहिती द्यायची''.

''पुढे?''

''मतदानाच्या आदल्या दिवशी वेगळी रक्कम मिळाली. ठरलेले मतदान करून घेतले''.

''अरे व्वा, मजा आहे, पण ही रक्कम आणून देणारे कोण?''

''ते आपल्या भागातील नव्हते साहेब, दुसऱ्या तालुक्यातून यायचे. फोन करणारा माणूस तर मला माहीतसुद्धा नाही''.

हे ऐकताना असंख्य गोष्टींचा उलगडा झाला. कोणत्याही राज्यशास्त्र अभ्यासात असे विषय असणार नाहीत. कोणत्याही निवडणूक विश्लेषक, तज्ज्ञाकडे याबाबत समज नाही. वरवर फक्त हिंदुत्ववादी किंवा विरोधी असे चित्र रंगवण्यात आणि त्यातच गुंतून ठेवण्यात आले आहे. निवडणूक मात्र व्यवस्थापन शैलीत आखली जाते आणि जिंकली जाते. संबंध भारतात मागची किमान तीस वर्षे भाजप याच कॉर्पोरेट पद्धतीने सत्ता काबीज करत आहे. सर्व यंत्रणा फार पूर्वी हातात धरण्यात आलेल्या आहेत. बाकी पक्ष अद्याप बालवाडीतसुद्धा नाहीत.

('मुक्त-संवाद'तून साभार)

(लेखक राजकीय-सामाजिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

– सुनील बडुरकर

ई-मेल : badurkarsunil@gmail.com

कथा

मुक्ती

माझं हे रूप पाहून दीदीला काही म्हणायची हिंमत झाली नाही. ती फक्त इतकंच म्हणाली, ''आम्ही तर बसूच; पण..'' आणि ती निघून गेली. मी उठून दरवाजा बंद केला आणि दुसऱ्या बाजूची खिडकी उघडली. ती बाहेरच्या बाजूला उघडत होती. खिडकी उघडताच बाहेरून आवाज आला, ''ही दु:खाची नाही तर समाधानाची गोष्ट आहे बेटा! डॉक्टर साहेब काय म्हणाले होते ते आठवतंय ना? देवाने यांना अगदी वेळेवर मुक्त केलं''. मी वळून अम्माकडे बघितलं. या आवाजाने ती जागी होऊ नये म्हणजे मिळवली. पण नाही... ती गाढ झोपली होती... अगदी निश्चिंत!



मुळ हिंदी कथा : **मन्नू भंडारी**
मराठी अनुवाद : **चंद्रकांत भोंजाळ**

अखेर ब्राम्ह मुहूर्तावर बाबूने शेवटचा श्वास घेतला. तसे तर मागच्या ८/१० दिवसापासून डॉक्टर सक्सेना कुटुंबियांना सारखं म्हणत होते, ''प्रार्थना करा परमेश्वराची, की आता यांना उचल बाबा. नाही तर कॅन्सरच्या वेदना एकदा सुरू झाल्या तर त्या त्यांना अजिबात सहन होणार नाहीत''. कुटुंबियांच्या मनातही असंच काहीतरी चाललं असावं. पण वरवर तरी सगळेजण